



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २६६ * नांदेड * मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राज्यातील शहरी भागात १६ ऑक्टोबरपासून पाणीकपात

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचा निर्णय



**मुंबई (प्रतिनिधी)–** अलनिनोच्या प्रभावामुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात मोठी घट झाली असून राज्यातील जलसाठा मर्यादित आहे. या संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचे पाण्याचे धरणनिहाय व वापरनिहाय अत्यंत सूक्ष्म नियोजन केले आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून १६ ऑक्टोबर रोजीपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १०% पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

सन २०१६ च्या खरीप हंगामातील 'ट्रिगर-१' लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पुढील वर्षापर्यंत अलनिनोचा प्रभाव राहण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने सर्व संबंधित यंत्रणांना पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करण्याचे आणि कठोर उपाययोजना राबवण्याचे स्पष्ट आदेश दिल्याचे महाजन यांनी सांगितले.

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य व १०% आपत्कालीन बफर साठाः- धरणे व जलाशयांमधील पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल. बाष्पीभवन, गाळ व अनधिकृत उपसा विचारात घेऊन ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी आरक्षित ठेवले जाईल. याशिवाय, भविष्यातील अनिश्चितता लक्षात घेऊन प्रत्येक धरणात १०% अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा राखीव ठेवला जाईल. पिण्याचे पाणी, जनावरे आणि चाऱ्याची गरज भागल्यानंतरच उर्वरित पाण्याचे सिंचनासाठी वाटप होईल. प्रथम रब्बी हंगामातील भुसार व चारा पिकांना, त्यानंतर इतर रब्बी पिकांना आणि पाणो शिल्लक राहिल्यासच बारमाही पिकांना मंजुरी दिली जाईल. पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर भर दिला जाईल.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंपदा विभाग, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग पूर्ण समन्वयाने काम करत आहेत. पालकमंत्री आणि कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाण्याचा नियमित आढावा घेतला जाईल. आगामी वर्षातील पाण्याचे संकट टाळण्यासाठी नागरिकांनी आणि सर्व यंत्रणांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.

### दुष्काळी कामांसाठी आमदार निधीतून करणार मदत

राज्यातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टंचाईग्रस्त भागांमध्ये तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी आमदार स्थानिक विकास निधीतून २५ लाख रुपयांपर्यंतचा निधी खर्च करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी नियोजन विभागाने सोमवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण तसेच नागरी भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईसह अन्य समस्यांवर स्थानिक पातळीवर तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी आमदार निधीतून ही कामे हाती घेण्याची मुभा देण्यात आली आहे. २५ लाख रुपयांच्या कमाल मर्यादेत कामे मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# राज्यात उकाडा वाढणार; ८ ते ११ ऑक्टोबरपर्यंत पारा ३७ ते ३९ अशांवर जाण्याची शक्यता



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात मागील काही दिवसांपासून उकाड्यात वाढ झाली असून बहुतांश प्रदेशात कमाल तापमान सरासरीहून अधिक नोंदले जात आहे. त्यामुळे ऑक्टोबरच्या पहिल्याच आठवड्यात नागरिकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. दरम्यान, पुढील काही दिवसात राज्याच्या उत्तरेच्या भागात कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्याच्या अंतर्गत भागात ८ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत कमाल तापमान ३७ ते ३९ अशांच्या दरम्यान राहील अशीही शक्यता आहे.

राज्यात शनिवारपासून मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला असून पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण राज्यातून मोसमी पाऊस माघारी जाईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. कोकण प्रदेशात मागील तीन चार दिवसांपासून उष्ण आणि दमट वातावरणामुळे उकाड्यात लक्षणीय वाढ झाली होती. यादरम्यान रत्नागिरी येथे ३८ अंश सेल्सिअस, तर मुंबई (कुलाबा) येथे ३७.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती.

संपूर्ण कोकण प्रांतात उकाडा कायम असला तरीही मागील दोन तीन दिवसांच्या तुलनेत कमाल तापमानात सोमवारी काहीशी घट होऊन तापमान ३२ ते ३४ अशांवर नोंदले गेले. तसेच मध्य महाराष्ट्रातील जळगाव येथे सोमवारी ३७.५ अंश सेल्सिअस, मालेगाव येथे ३८.४ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले, जे सरासरी कमाल तापमानाहून ५.९ अंशांनी अधिक होते. तसेच सोलापूर येथे ३७.४, परभणी ३५.७, तर सातारा येथे ३५.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. त्यामुळे पुढील काही दिवसात उकाडा आणखी वाढण्याचा अंदाज असून आधीच दुष्काळाचा सामना करणाऱ्या नागरिकांना उन्हाचा ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्राच्या भाजप युवती प्रमुखपदी नांदेडच्या शांभवी साले

## भाजप युवा मोर्चाची नवी टीम, राज्यातील २९ पदाधिकाऱ्यांची वर्णी

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने मोठा संघटनात्मक निर्णय घेतला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्रचव्हाण यांच्या सूचनेनुसार प्रदेश सरचिटणीस युवा मोर्चा प्रभारी सुनील राणे आणि युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी भाजप युवा मोर्चाच्या नव्या प्रदेश टीमची अधिकृत घोषणा केली आहे. या नव्या कार्यकारिणीत एकूण २९ पदाधिकाऱ्यांच्या नावांचा समावेश आहे. यामध्ये नांदेड भाजपचे माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांची कन्या नगरसेविका शांभवी सालेची युवती प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



या नव्या कार्यकारिणीत तरुणाईला प्राधान्य देण्यात आले असून सर्वच्या सर्व २९ पदाधिकारी हे ३५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील आहेत. पक्ष संघटनेत आक्रमक आणि नव्या दमाच्या तरुणांना संधी देऊन आगामी निवडणुकांच्या रिंगणात पक्षाची ताकद वाढवण्याचा भाजपचा हा मोठा मास्टरस्ट्रोक मानला जात आहे.

३५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील चेहऱ्यांना संधी देऊन भाजप युवा मोर्चाच्या माध्यमातून राज्यातील तरुण मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात आहे. या निर्णयामुळे भाजपच्या युवा आघाडीत नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

या नव्या कार्यकारिणीत अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'युवती प्रमुख' पदाची जबाबदारी नांदेडच्या २८ वर्षीय शांभवी सालेकडे सोपवण्यात आली आहे. राज्यातील युवतींचे संघटन मजबूत करणे आणि तरुणींच्या प्रश्नांवर भाजप युवा मोर्चाच्या माध्यमातून आवाज उठवणे, ही मुख्य जबाबदारी आता शांभवी साले पार पाडणार आहे.

शांभवी साले यांच्या निवडीमुळे आगामी काळात युवतींचे नेटवर्क राज्यभरात विस्तारण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

या नव्या टीमच्या घोषणेनंतर आता लवकरच जिल्हा आणि तालुका स्तरावरील युवा मोर्चाच्या नव्या कार्यकारिणी जाहीर केल्या जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# एमपीएससीचे आजी-माजी अध्यक्ष, सदस्यांच्या चौकशीसाठी समिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कामकाजाबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर आयोगाचे माजी व विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्य यांच्याविरोधात संविधानाच्या कलम ३१७ नुसार कार्यवाही करण्यासाठी समिती गठीत करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांच्याकडे केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तिच्याकडून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि त्यातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती करण्यात आली आहे. एमपीएससीच्या परीक्षा आणि आयोगाच्या कामकाजाबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आंदोलन सुरू आहे. आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी भूमिका घेतली असून या आंदोलनाला विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही पाठिंबा दिला आहे.

# 'आयआयबी' क्लासेससमोर विद्यार्थिनीवर खंजरने हल्ला

## विद्यार्थिनींची सुरक्षा वाऱ्यावर, एकतर्फी प्रेमातून हल्ला झाल्याचा संशय

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या भाग्यनगर रस्त्यावरील 'आयआयबी' क्लासेससमोर सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास एका १८ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर तरुणाने खंजरने चार वार करून जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. ही माहिती पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांना समजताच त्यांनी तात्काळ आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन मारेकऱ्याच्या मुसक्या आवळल्या.

शहरातील तरोडा बु. परिसरातील एक १८ वर्षीय विद्यार्थिनी आपल्या मैत्रिणीसोबत यशवंत कॉलेजमधून घराकडे जात होती. राहूल कॉलनी तरोडा बु. येथील रोहित शिवाजी पोहरे (वय २१) इलेक्ट्रिशियन हा युवक मागील दोन वर्षांपासून वरील जखमी मुलीला बोलण्याचा प्रयत्न करत होता. 'तू मला आवडतेस, आपण लग्न करू' असे म्हणून प्रेमाची मागणी घातली होती. मात्र सदर युवतीने त्याला नकार दिला होता. हा प्रकार पीडित मुलीच्या घरच्यांनाही माहित होता. त्यांनीही आरोपी रोहित याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा राग मनात धरून सोमवारी दुपारी आयआयबी क्लासेसच्या रस्त्यावर अभ्युदय बँकेजवळ त्याने तिला गाठले आणि खंजरने तिच्यावर हल्ला केला. चार वार झाल्याने ती रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळली. यावेळी घटनास्थळी उपस्थित आणि रोहित याला जागेवरच पकडून धुलाई करून पोलिसांच्या ताब्यात दिले.



आरोपी रोहित पोहरे

घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोलीस उपनिरीक्षक संकेत सवराते हे कर्मचाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमी विद्यार्थिनीला रुग्णालयात हलविण्यात आले. तिच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती सध्या धोक्याबाहेर असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. कोचिंग क्लासेस परिसरात भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गोदावरी काठावरील अनाधिकृत पाणी उपशावर प्रशासनाचा हातोडा; ५१ डेपोंचे वीज कनेक्शन तोडले

## २१५ अनाधिकृत मोटारींचे कनेक्शन खंडित; जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर महसूल, पोलिसांची संयुक्त धडक कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार महसूल आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने केलेल्या कारवाईत ५१ डेपोंचे वीज कनेक्शन खंडित करण्यात आले. तसेच पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या २१५ अनाधिकृत मोटारींचे कनेक्शनही तोडण्यात आले.

नांदेड शहरासह गोदावरी नदीकाठावरील गावांमध्ये भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने अनधिकृत पाणी उपशाविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी जलाशयातील उपलब्ध पाणीसाठा भविष्यात पिण्याच्या पाण्यासाठी सुरक्षित ठेवणे, तसेच पाण्याचा अनधिकृत वापर आणि अपव्यय रोखणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

या मोहिमेअंतर्गत प्रशासनाच्या पथकाने रहाटी, जैतापूर, सोमेश्वर, पिंपळगाव को., बोरगाव ते., थुगाव, मार्कंड, पिंपळगाव निमजी, कल्लाळ, विष्णुपुरी आणि कोटीतीर्थ परिसरात ही कारवाई केली.

तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ए. बी. सिंगणवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी श्रीकृष्ण येलमटे, एएसआय रामराव ढोले, मंडळ अधिकारी सय्यद मोहसीन, पोलीस उपनिरीक्षक रामराव केंद्रे, एम. एफ. बागवान यांच्या पथकाने मोहिमेत सहभाग घेतला. याशिवाय मंडळ अधिकारी मधुकर फुलवले, पोलीस उपनिरीक्षक गोविंद जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही कारवाईत सहभाग नोंदवला.

# नवीन मतदार नोंदणीसाठीच्या 'फॉर्म ६' मधील बदलाला सुप्रीम कोर्टाची मान्यता नाही

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** निवडणूक आयोगाने गेल्या आठवड्यात दावा केला होता की, काही राज्यांमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेसाठी ऑनलाईन 'फॉर्म ६' सोबत जोडलेल्या नवीन घोषणापत्राला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. मात्र, सोमवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाचा हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे.

कोणत्याही सुधारित फॉर्म ६ ला आम्ही मंजुरी दिलेली नाही, हे स्पष्ट असायला हवे. जेव्हा कोर्टात रेकॉर्ड सादर केला जाईल, तेव्हा हा फॉर्म नेमका कोणी बदलला हे आम्हाला पाहायचे आहे, अशा अत्यंत कडक शब्दांत सीजेआय सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाचे कान उपटले आहेत.

'फॉर्म ६' च्या नव्या घोषणापत्रामध्ये बदल करण्याचा निर्णय वादात सापडला होता. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी या बदलांवर तीव्र आक्षेप घेतला होता. 'केंद्र सरकारने मतदार नोंदणी नियम, १९६० मध्ये सुधारणा केल्याशिवाय अशा प्रकारे फॉर्म बदलता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

या विरोधानंतरही नवीन फॉर्म लागू करण्यात आला. त्यानंतर टीका टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने २६ सप्टेंबर रोजी प्रसिद्धी पत्रक जारी करून बिहार एसआयआरसंदर्भात मे महिन्यात दिलेल्या सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा हवाला दिला होता.




# मुंबईतील आगारात दहा सीएनजी बसेस जळून खाक

**मुंबई (प्रतिनिधी)–** बेस्ट उपक्रमाच्या शीव येथील आणिक आगाराच्या आवारात उभ्या असलेल्या डागा ग्रुपच्या सीएनजी मिडी बस गाड्यांना सोमवारी संध्याकाळी पावणे सहाच्या सुमारास आग लागल्याने एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत डागा ग्रुपच्या भाडेतत्वावरील १० बस जळून खाक झाल्या.

आगीची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. या बसगाड्यांना शार्ट सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आणिक बस आगारात पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग, आरटीओ पासिंगजवळ ही घटना घडली. बस आगाराच्या आवारात शेजारी -शेजारी उभ्या असलेल्या ८ ते १० सीएनजी बसगाड्यांना आग लागल्याचे अग्निशमन दलाच्या प्राथमिक माहितीत नमूद करण्यात आले आहे.

अग्निशमन दलाने संध्याकाळी ५.५४ वाजता 'लेव्हल-१' फायर कॉल घोषित केला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या, पाच वॉटर टँकर, एक एरियल वॉटर टॉवर आणि क्विक रिस्पॉन्स व्हेईकलसह रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. पोलीस आणि बेस्टच्या वाहतूक विभागानेही घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. बसगाड्यांना आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# नांदेडात जुगार अड्ड्यावर उमाप यांच्या पथकाचा छापा; ८ जणांविरुद्ध कारवाई, ५.८९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक नांदेड जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने रविवारी उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उस्माननगर शिवारातील सातबारा हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या टिनशेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला.



या कारवाईत १ लाख १९ हजार ९२० रुपयांची रोख रक्कम, ७ मोबाईल आणि ५ मोटारसायकली असा एकूण ५ लाख ८९ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यावेळी पोलिसांनी गोविंदसिंग बाबूसिंग शिरा रा. टेळकी ता. लोहा, पांडुरंग हनुमंत घोरबांड रा. उस्माननगर, लक्ष्मीकांत उत्तम घोरबंड रा. उस्माननगर, माणिक अशोकराव कांबळे रा. आंबेडकर नगर नांदेड, सिद्धेश्वर एकनाथ काळे जुना कौठा नांदेड, साई गोविंद पाटील सिडको नांदेड आणि बसवराज शंकर पटणे सिडको नांदेड यांना अटक केली. याप्रकरणी एकूण ८ जणांवर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोलीस हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवता यावी, यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१५०१ ००१०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती या हेल्पलाइनवरून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नकाशातील खोटी रेषा, जगातील नवे भांडण!

जगाचा नकाशा हा भूगोलाचा धडा नाही; तो राष्ट्रांच्या अस्तित्त्वाचा दस्तऐवज आहे. नकाशावर आखलेली प्रत्येक सीमा ही एखाद्या देशाच्या सार्वभौमत्त्वाशी जोडलेली असते. म्हणूनच नकाशा चुकीचा असणे म्हणजे केवळ भौगोलिक चूक नव्हे, तर इतिहास, वास्तव आणि राष्ट्रांच्या अधिकारांशी केलेली प्रतारणा आहे. संयुक्त राष्ट्रांत 'करेक्ट द मॅप' या ठरावाला मिळालेले प्रचंड समर्थन त्यामुळेच महत्त्वाचे आहे. आफ्रिकेचा नकाशा दुरुस्त करण्यासाठी १६४ देशांनी या ठरावाच्या बाजूने मतदान केले, ही बाब जगाला स्पष्ट संदेश देणारी आहे. जगाचा नकाशा तयार करणाऱ्यांनी मनमानी करण्याचे दिवस आता संपले पाहिजेत. एखाद्या देशाचा भूभाग लहान दाखवणे, दुसऱ्याचा अनाठायी मोठा दाखवणे किंवा वादग्रस्त प्रदेश एखाद्या देशाच्या मालकीचा असल्याप्रमाणे दाखवणे, हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारता कामा नये. मर्केटर प्रोजेक्शनचे उदाहरण यासाठी पुरेसे आहे. समुद्रमार्गावरील दिशानिर्देशनासाठी उपयुक्त ठरलेली ही पद्धत पृथ्वीवरील भूभागांचे आकारमान दाखवताना मोठी विकृती निर्माण करते. विषुववृत्तापासून दूर असलेले प्रदेश प्रत्यक्षापेक्षा मोठे दिसतात. आफ्रिकेसारखा प्रचंड भूभाग तुलनेने लहान भासतो. प्रश्न असा आहे की, शतकानुशतके जगाकडे पाहण्याची आपली दृष्टीच जर चुकीच्या नकाशावर आधारलेली असेल, तर आपण जगाचे वास्तव किती अचूक समजून घेतले? नकाशा हा केवळ रेखाटन नसतो. तो मानसिकता घडवतो. मुलांच्या पाठ्यपुस्तकात एखादा भूभाग जसा दिसतो, तसा तो त्यांच्या मनात कायमचा ठसतो. डिजिटल नकाशावर एखादी सीमा जशी दिसते, तिला सामान्य माणूस तितक्याच सहजतेने सत्य मानतो. त्यामुळे नकाशातील विकृती ही फक्त तांत्रिक समस्या राहिलेली नाही; ती ज्ञानव्यवस्थेची समस्या बनली आहे. यापेक्षाही गंभीर प्रश्न म्हणजे आंतरराष्ट्रीय सीमांचा. जगात आज अनेक सीमावाद आहेत. दोन देश एखाद्या प्रदेशावर दावा करतात. अशा वेळी तिसऱ्या देशाने किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेने वापरलेल्या नकाशात जर त्या प्रदेशाचा एकतर्फी समावेश केला, तर त्यातून राजनैतिक वाद निर्माण होणे स्वाभाविक आहे. नकाशातील चुकीची रेषा कधी कधी बंदुकीच्या गोळीपेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकते; कारण गोळी एकदाच जखम करते, पण चुकीचा नकाशा पिढ्यान्‌पिढ्या चुकीची धारणा निर्माण करू शकतो. भारताला या प्रश्नाचे गांभीर्य चांगलेच ठाऊक आहे. भारताच्या सीमांबाबत विविध देशांशी मतभेद आहेत. त्यामुळे भारताचा भूभाग कोणत्याही नकाशात चुकीचा दाखवला गेला, तर भारताने त्यावर आक्षेप घेणे साहजिकच आहे. पण हा प्रश्न केवळ भारतापुरता मर्यादित नाही. आज भारताचा भूभाग चुकीचा दाखवला जाईल, उद्या दुसऱ्या देशाचा; आणि परवा तिसऱ्या देशाचा. म्हणूनच नियम सार्वत्रिक असला पाहिजे, प्रत्येक देशाचा नकाशा अचूक, जबाबदार आणि वास्तवाधारित असला पाहिजे. यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पृथ्वी गोलाकार आहे आणि तिला सपाट नकाशावर दाखवताना काही ना काही विकृती अपरिहार्य आहे. त्यामुळे कोणतेही एक नकाशा प्रोजेक्शन जगाचे अंतिम सत्य ठरू शकत नाही. भारतानेही 'इक्वल एरिया' अर्थात समान क्षेत्रफळ पद्धतीच्या व्यापक वापराला पाठिंबा देताना कोणत्याही एका विशिष्ट नकाशा पद्धतीला अंतिम मान्यता नसल्याचे स्पष्ट केले आहे. हा विवेकपूर्ण दृष्टिकोन आहे. मुद्दा 'कोणता नकाशा सुंदर दिसतो?' हा नाही. मुद्दा आहे तो कोणता नकाशा कोणत्या उद्देशासाठी अधिक अचूक माहिती देतो? क्षेत्रफळ दाखवायचे असेल तर एक पद्धत, दिशानिर्देशनासाठी दुसरी आणि सीमांचे अचूक चित्रण करण्यासाठी आणखी वेगळी पद्धत उपयोगी ठरू शकते. विज्ञानाला राजकीय सोयीचे रूप देण्याऐवजी राजकारणाने वैज्ञानिक अचूकतेचा आदर केला पाहिजे. आजच्या डिजिटल युगात हा प्रश्न आणखी गंभीर आहे. गुगलसारख्या डिजिटल नकाशांपासून शालेय पाठ्यपुस्तकांपर्यंत आणि कृत्रिम बुद्धिमत्तेपासून आंतरराष्ट्रीय संकेतस्थळांपर्यंत नकाशांचा वापर प्रचंड वाढला आहे. त्यामुळे चुकीचा नकाशा कोट्यवधी लोकांपर्यंत काही सेकंदांत पोहोचू शकतो. एका क्लिकने पसरलेली चुकीची सीमा नंतर दुरुस्त केली तरी तिच्यामुळे निर्माण झालेला गैरसमज सहज नाहीसा होत नाही. म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या या उपक्रमाकडे केवळ आफ्रिकेच्या प्रतिनिधित्त्वाचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा प्रश्न आहे तो जगाने स्वतःचे वास्तव किती प्रामाणिकपणे दाखवायचे? नकाशावर आफ्रिकेला न्याय मिळणे आवश्यक आहे. पण त्याचबरोबर भारताला, आशियाला, दक्षिण अमेरिकेला आणि जगातील प्रत्येक देशाला न्याय मिळणेही तितकेच आवश्यक आहे. कोणत्याही राष्ट्राच्या सीमा मनमानीने बदलणारा, भूभागाचे चुकीचे चित्रण करणारा किंवा एका देशाच्या दाव्याला सार्वत्रिक सत्य म्हणून मांडणारा नकाशा जगाच्या शांततेसाठी घातक आहे. कारण देशांमधील भांडणे अनेकदा जमिनीवर सुरू होतात; पण त्यांची बीजे नकाशावर पेरली जातात. म्हणूनच जगाने आता एक साधा नियम स्वीकारला पाहिजे. तो म्हणजे नकाशा अचूक असेल, तर संवादाला वाव राहतो; नकाशा खोटा असेल, तर संघर्षाला निमंत्रण मिळते. जगाला चुकीच्या रेषांची नव्हे, तर सत्याच्या रेषांची गरज आहे. नकाशे भांडणे पेटविण्याचे हत्यार न बनता राष्ट्रांना एकमेकांचे वास्तव समजून घेण्याचे माध्यम झाले पाहिजेत. 'करेक्ट द मॅप'चा खरा अर्थ हाच की नकाशा दुरुस्त करा, वास्तव स्पष्ट करा आणि जगाला अनावश्यक संघर्षापासून वाचवा!

# भारतीय इतिहासातील दोन मार्गदर्शक नेतृत्व-संशोधनात्मक विश्लेषण

नुकतीच २ ऑक्टोबर रोजी आपण राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी केली. हा दिवस आधुनिक भारताच्या निर्मितीमधील दोन महत्त्वाचे घटक, 'नैतिक अधिष्ठान' आणि 'प्रशासकीय दृढता' यांचा वेध घेणारा ठरला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा संपूर्ण जग साम्राज्यशाही, वसाहतवाद आणि लष्करी बळाच्या प्रभावाखाली होते, तेव्हा भारतीय उपखंडात एका आगळ्यावेगळ्या सामाजिक-राजकीय प्रयोगाची पायाभरणी होत होती. महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री या दोन नेत्यांचा जन्म एकाच दिवशी होणे, हा केवळ काळाचा योगायोग नसून ती भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय उपजत ताकदीची एक गुंफण आहे. एक संशोधक म्हणून जेव्हा मी या दोन्ही नेत्यांच्या जीवनप्रवासाचा वेध घेतो, तेव्हा त्यांच्या विचारांतील साम्यस्थळे आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाची परंपरा आजच्या २१ व्या शतकातील जागतिक संकटांवर मात करण्यासाठी मार्गदर्शक ठरते.



**दक्षिण आफ्रिका आणि 'सत्याग्रह'**

म. गांधी यांच्या विचारसरणीचा अभ्यास करताना, त्यांच्या सुरुवातीच्या आयुष्यातील दोन घटकांचे विश्लेषण करणे गरजेचे ठरते. त्यांचे बालपण पोरबंदरमध्ये अतिशय सामान्य वातावरणात गेले असले, तरी घरच्या शिस्तीमुळे त्यांच्यात आत्मपरीक्षणाची सवय निर्माण झाली. म.गांधीजींनी स्वतः 'माझे सत्याचे प्रयोग' या ग्रंथात नोंदवले आहे की, 'श्रवण पितृभक्ती' आणि 'सत्यवादी हरिश्चंद्र' या नाटकांनी त्यांच्या बालमनावर 'सत्य' आणि 'कर्तव्य' या दोन मूलभूत मूल्यांचे रोपण केले. ही नैतिक मूल्ये त्यांनी त्यांच्या जीवनात आत्मसात केली.

म. गांधीजी जेव्हा दक्षिण आफ्रिकेत गेले, तेव्हा तिथल्या पीटरमॅरिट्सबर्ग रेल्वे स्थानकावरील वर्णद्वेषी घटनेने त्यांच्या वैयक्तिक प्रवासाला एका जागतिक आंदोलनात रूपांतरित केले. पहिल्या वर्गाचे तिकीट असतानाही केवळ रंगावरून त्यांना गाडीबाहेर काढले जाणे, ही केवळ एक घटना नव्हती; तो प्रस्थापित व्यवस्थेच्या क्रूरतेचा पुरावा होता. 'गांधी हेरिटेज पोर्टल'वरील अधिकृत माहितीवरून स्पष्ट होते की, म. गांधींनी तिथे केवळ प्रतिकार केला नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी 'नाताळ इंडियन काँग्रेस' ची उभारणी केली. तिथेच त्यांनी 'सत्याग्रह' या संकल्पनेचे यशस्वी प्रायोगिक परीक्षण केले. शारीरिक बळाचा वापर न करता, केवळ नैतिक बळाने आणि आत्मक्लेश सहन करून समोरच्याचे मन परिवर्तन करणे, हा मानवी इतिहासातील एक क्रांतिकारी सामाजिक शोध होता.

**ग्रामीण अर्थशास्त्र आणि 'जनांदोलन'**

१९१५ मध्ये म. गांधीजी जेव्हा भारतात परतले, तेव्हा त्यांचे राजकीय मार्गदर्शक गोपालकृष्ण गोखले यांनी त्यांना दिलेला सल्ला अत्यंत महत्त्वाचा होता: भारताची वास्तविक स्थिती समजून घ्या. म. गांधींनी संपूर्ण देशाचा जो दौरा केला, तो एका समाजशास्त्रज्ञाच्या नजरेतून केला. त्यांनी पाहिले की, स्वातंत्र्यलढा हा केवळ सुशिक्षित आणि शहरी वर्गापुरता मर्यादित होता. भारताची खरी ऊर्जा शहरांत नसून, खेड्यापाड्यातील शेतकरी आणि मजुरांमध्ये आहे, हे त्यांनी ओळखले.

या निरीक्षणातून त्यांच्या जीवनशैलीत एक मोठा बदल झाला. त्यांनी पाश्चात्य पोशाखाचा त्याग करून साधी धोती (पंचा) परिधान केली. हा केवळ एक प्रतीकात्मक बदल नव्हता; तो देशातील गरीब आणि ग्रामीण जनतेशी तादात्म्य निर्माण करण्याचा एक प्रभावी मार्गही होता. १९१७ चा चंपारणचा नीळ उत्पादक शेतकऱ्यांचा लढा, १९१८ चा खेडा सत्याग्रह आणि अहमदाबादमधील गिरणी कामगारांचे आंदोलन हे म. गांधीजींच्या 'तळागाळातील नेतृत्वाचे' उत्तम उदाहरणे आहेत. या प्रयोगांमुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे रूपांतर एका अथांग 'जनांदोलनात' झाले.

१९२० चे असहकार आंदोलन, १९३० चा दांडी येथील सविनय कायदेभंग आणि १९४२ चे 'भारत छोडो' आंदोलन या तिन्ही मोठ्या कालखंडांकडे पाहिले तर एक गोष्ट स्पष्ट होते, गांधीजींनी प्रत्येक आंदोलनात नैतिकतेला सर्वोच्च स्थान दिले. चौरीचौरा येथील हिंसक घटनेनंतर असहकार आंदोलन मागे घेण्याचा त्यांचा निर्णय हा 'अहिंसेच्या तत्त्वाशी' प्रामाणिक राहण्याचा एक धाडसी निर्णय होता. दांडी यात्रेत त्यांनी 'मीठ' या अत्यंत साध्या, जीवनावश्यक घटकाला आंदोलनाचे केंद्र बनवले, जे त्यांच्या अचूक रणनीतीचे निदर्शक होते. स्वातंत्र्यासोबतच त्यांनी अस्पृश्यता निवारण आणि 'ग्रामस्वराज्य' म्हणजेच खेड्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचा जो आराखडा मांडला, तो आजही भारताच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

**लालबहादूर शास्त्री: साधेपणा आणि संघर्ष**

महात्मा गांधींनी मांडलेल्या साधेपणाच्या आणि नैतिकतेच्या सिद्धांताला प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर प्रत्यक्ष जगणारे नेतृत्व म्हणजे लालबहादूर शास्त्री. २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मुघलसराई येथील एका अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील शाळेत शिक्षक होते, ज्यांचे निधन लाल बहादूर शास्त्री केवळ दीड वर्षांचे असताना झाले. आईने मोठ्या संघर्षातून त्यांचे संगोपन केले. वाराणसीत हायस्कूलचे शिक्षण घेत असताना, गरिबीमुळे त्यांच्याकडे अनेकदा चपला खरेदी करण्यासाठीही पैसे नसायचे. त्यामुळे उन्हाळ्याच्या कडक उन्हात रस्ते तापलेले असतानाही ते अनवाणी पायाने कित्येक मैल चालत शाळेत जाणाऱ्या या बालकाच्या मनात गरिबीने हतबलता नाही, तर एक तीव्र स्वाभिमान आणि जिद्द निर्माण केली.

वाराणसीच्या काशी विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना मिळालेली 'शास्त्री' (विद्वान) ही पदवीच लोकांच्या मनात त्यांच्या नावाचाच एक भाग म्हणून रुजली आहे. स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतल्यानंतर त्यांनी आपल्या आयुष्यातील मौल्यवान ७ वर्ष काळ तुरुंगात घालवला, ज्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक परिपक्व आणि कणखर बनले.

**'जय जवान, जय किसान' आणि खंबीर नेतृत्व**

पंडित नेहरूंच्या निधनानंतर जेव्हा शास्त्रीजींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांचा कार्यकाळ केवळ १९ महिन्यांचा लाभला. परंतु, हा काळ भारतीय इतिहासातील सर्वात मोठ्या आव्हानांचा काळ होता. देशात लागोपाठ पडलेले दुष्काळ, अन्नधान्याची तीव्र टंचाई आणि गव्हाच्या आयातीसाठी अमेरिकेवर असलेले अवलंबित्व, या पार्श्वभूमीवर त्यांनी या संकटावर मात करण्यासाठी देशातील जनतेला आठवड्यातून एक दिवस उपवास करण्याचे आवाहन केले. एक नेता जेव्हा स्वतःच्या घरातून या नियमाची अंमलबजावणी करतो, तेव्हा संपूर्ण देश त्याच्या पाठीशी उभा राहतो, हे शास्त्रीजींनी दाखवून दिले.

नेमक्या याच नाजूक परिस्थितीत १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर युद्ध लादले. शांत आणि लहान शरीरयष्टीचे दिसणारे शास्त्रीजी या लष्करी संकटात अत्यंत कठोर प्रशासक बनले. त्यांनी भारतीय लष्कराला तात्काळ आणि स्पष्ट आदेश दिले की, केवळ सीमेचे रक्षण करू नका, तर शत्रूच्या हद्दीत घुसून उत्तर द्या. भारतीय सैन्याने लाहोरपर्यंत धडक मारत हा लढा जिंकला. या युद्धाने देशाला दोन महत्त्वाचे स्तंभ दिले, सीमेवर रक्ताचे पाणी करणारा सैनिक आणि शेतात घाम गाळून देशाचे पोट भरणारा शेतकरी. या दोन घटकांना एकत्र गुंफणारा 'जय जवान, जय किसान' हा त्यांचा नारा भारताच्या संरक्षणाचा आणि स्वावलंबनाचा पाया बनला. १० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे शांतता करारावर स्वाक्षरी केल्यानंतर, ११ जानेवारीच्या पहाटे त्यांचे झालेले आकस्मिक निधन हा देशासाठी एक मोठा धक्का होता. मरणोत्तर त्यांना 'भारतरत्न' या सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले.

**२१ व्या शतकातील प्रासंगिकता: संशोधनात्मक विश्लेषण**

आज जेव्हा आपण २१ व्या शतकातील जागतिक परिस्थितीचे विश्लेषण करतो, जिथे युद्धे, हवामान बदल राजकीय भ्रष्टाचार आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास, यांसारखी संकटे तीव्र झाली आहेत, तेव्हा म. गांधीजी आणि शास्त्रीजी यांचे विचार इतिहास नाहीत, तर ते भविष्यातील उपाय आहेत. संयुक्त राष्ट्रांनी २ ऑक्टोबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून घोषित करणे, हे गांधीवादी तत्त्वज्ञानाच्या जागतिक स्वीकारार्हतेचे प्रतीक आहे.

दुसरीकडे, लालबहादूर शास्त्री यांच्या सार्वजनिक जीवनातील साधेपणा आणि वैयक्तिक प्रामाणिकतेचे अनेक उल्लेख आढळतात. पंतप्रधानपदासारख्या सर्वोच्च घटनात्मक पदावर असतानाही त्यांनी वैयक्तिक गरजांसाठी कर्ज घेतल्याचे आणि त्यांच्या निधनानंतर ते कर्ज त्यांच्या कुटुंबाने फेडल्याचे उदाहरण त्यांच्या वैयक्तिक आर्थिक शिस्तीचे प्रतीक म्हणून सांगितले जाते. तसेच साधे जीवन जगण्याची आणि उपलब्ध वस्तूंचा काटकसरीने वापर करण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या सार्वजनिक प्रतिमेचा महत्त्वाचा भाग होती.

**स्मरणापासून आचरणाकडे**

थोडक्यात सांगायचे तर, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ज्या नैतिक मूल्यांवर आणि सत्याग्रहाच्या सिद्धांतावर भारताच्या स्वातंत्र्याचा पाया रचला, त्याच पायावर लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या लहानशा कार्यकाळात समर्थ, स्वावलंबी आणि कणखर भारताची इमारत उभी केली. म्हणूनच दरवर्षी २ ऑक्टोबर हा दिवस केवळ या दोन महान व्यक्तिमत्त्वांच्या आठवणींना उजाळा देण्याचा नाही, तर आजच्या प्रशासनाने, राजकीय वर्गाने आणि तरुण पिढीने त्यांच्या जीवन-मूल्यांचा दैनंदिन जीवनात स्वीकार करणे आवश्यक आहे. जेव्हा सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्याचा मार्ग अवलंबला जाईल, तेव्हाच या दोन महापुरुषांचे स्मरण खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

**-डॉ. गोपाळ मोहनराव कदम,**
(चीफ रिसर्च सायंटिस्ट)
मु. पो. लिंबगाव (रे. स्टे.),
ता. जि. नांदेड,

# पालकांनी पाल्यांना पुरेसा वेळ द्यावा!



पालक...आजचे काही पालक आपल्या पाल्यांच्या विकासासाठी फार महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. ते आपल्या पाल्यांना शिकवितातच. त्यांना वेळातील वेळ देतातच. ज्यातून विद्यार्थ्यांचा विकासही होत असतो. परंतु काही पालक आजही सुशिक्षित असले तरी आपल्या पाल्यांकडे विशेष असं लक्ष देत नाहीत. त्यांना पुरेसा वेळ देत नाहीत. कारण मोबाईलचा काळ आहे व ते पालक आपल्या फावल्या वेळेत आपल्या पाल्यांकडे वेळ देण्याऐवजी मोबाईलमध्ये गुंतून राहतात. ज्यातून त्यांच्या मुलांचा विकास खुंटतो. मात्र पूर्वी असं नव्हतंच. पुरुषसत्ताक कुटुंबपद्धती असल्यानं फक्त आईच आपल्या मुलांकडे लक्ष देत असे. चूल व मूल हे स्त्रीचं कार्य समजलं जायचं. ज्यातून स्त्रीच आपल्या मुलांना घडविण्यासाठी, त्यांच्यावर संस्कार फुलविण्यासाठी त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायची. वेळही द्यायची. कारण पुरुष कुठं ना कुठं गुंतलेलाच असायचा. आज समाज सुधारलेला असून समाजात समानता आलेली आहे. त्यामुळंच जसा आज पुरुष काम करतो तशीच स्त्रीही काम करायला लागली आहे. त्यामुळंच मुलांकडे ते विशेष लक्ष दोघांनीही देण्याची गरज आहे. त्यासोबतच पुरेसा वेळही.

आजच्या काळात बरीचशी मुलं ही आपल्या कार्यक्षेत्रात आघाडीवर आहेत. जसे की ते मेधावी यादीत पहिल्या क्रमांकावर येत आहेत. त्याचंही कारण म्हणजे पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष देणं. ते पालक आपल्या मुलांची खाजगी शिकवणी लावून देतात. मुलं शाळेतून घरी आल्यावर त्यांना खाजगी शिकवणी वर्गाला पाठवतात. ती मुलं खाजगी शिकवणीतून घरी आल्यावर शाळेत काय शिकवलं व काय शिकवलं नाही. ते तपासतात. त्यातच खाजगी शिकवणी वर्गात काय शिकवले, काय नाही तेही तपासतात. ज्यातून अशांची मुलं पुढं जातातच.

शिक्षक...शिक्षक आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवतात. त्यासाठी पुरेसा वेळ देतात. ते एकएका विद्यार्थ्याला वेळ देतात. ज्यातून त्यांच्या वर्गातील मुलं पुढे जातात. त्यांची प्रगती होते. परंतु हे जरी खरं असलं तरी काही मुलं ही निश्चितच मागं राहतात. त्याचं कारण आहे पुरेसा विद्यार्थ्यांना वेळ देणं. ज्या मुलांना, पालक, शिक्षक आणि इतर सर्व घटक पुरेसा वेळ देत असतात. उदाहरण द्यायचं असेल तर थॉमस अल्वा एडीसनचं देता येईल. त्यांचे वेगवेगळे प्रश्न ऐकून हताश झालेल्या शिक्षकांनी त्याला वर्गातून खरंलतर हाकलून लावले. त्याच्याजवळ शाळा सोडल्याचा दाखला दिला व एक चिठ्ठी लिहिली की, ज्या चिठ्ठीत लिहिलं होतं, 'आपला मुलगा शाळा शिकविण्याच्या व शाळेत बसू देण्याच्या लायक नाही. आजपासून आम्ही त्याला शाळेत बसू देणार नाही.'

ती चिठ्ठी....ती चिठ्ठी पाहताच त्याची आई हताश झाली नाही. तशी ती शिकली नव्हतीच. ती काय शिकविणार होती आपल्या मुलाला. परंतु तिनं आपल्या मुलाचा अपेक्षाभंग होवू दिला नाही. ती दररोज कामाला जायची व सायंकाळी घरी आल्यावर आपल्या मुलाला घेवून बसायची. त्यातच तो जे जे प्रश्न करायचा. त्याची उत्तरं शोधून ती त्याला द्यायची. ज्या बहुमुल्य वेळ देण्यातून तिचा मुलगा घडला व तो जागतिक स्तराचा शास्त्रज्ञ बनला. परंतु ही प्रक्रिया आजच्या काळात कोणाचीच आई करीत नाही. पर्यायानं सांगायचं झाल्यास तीच मुलं पुढे जात असतात व उच्चतम अर्हताही प्राप्त करीत असतात. ज्यांना पालक, शिक्षक पुरेसा वेळ देत असतात. ज्या मुलांना पालक पुरेसा वेळ देवू शकत नाहीत ती मुलं मागंच राहतात. अभ्यास आणि सर्व गोष्टीत.

आपल्या मुलांना वेळ देणं. ही एक प्रक्रिया आहे. शिक्षक, पालकांचे आपल्या मुलांना वेळ देणे. ही देखील एक प्रक्रियाच आहे. परंतु आज पुरेसा वेळ देण्याची प्रक्रिया ही घडत नाही. त्याचं कारण आहे, पालकांची मुलं. आज महागाई आहे व महागाईत सर्वच वस्तू महागलेल्या आहेत. घराच्या गरजा पूर्ण होत नाहीत. अशा गरजा पूर्ण करण्यासाठी दररोज पालकांना कामाला जावं लागतं. एकाएका घरी कितीतरी मुलं असणं. अशा मुलांचं जेवनखावण, पालनपोषण करण्यासाठी पालकांना सतत कामाला जावं लागतं. कारण पोटाची खळगी महत्त्वपूर्ण. पालक मंडळी ही पोटाची खळगी भरण्यासाठी सतत कामाला जात असतात. ज्यातून ते आपल्या मुलांना वेळ अःएत नाहीत. ज्यातून नुकसान होतं.

शिक्षकही अशी मुलं शाळेत आली आणि ती कमकुवत असली तर त्यांच्याकडे विशेषतः दुर्लक्ष करतात. त्याचं कारण आहे, विद्यार्थ्यांचं विस्मरण. विद्यार्थ्यांना जे शिकवलं जातं. ते शिकविलेलं पालकांच्या पुरेसा वेळ न देण्यानं बरेच विद्यार्थी विसरुन जातात. ज्यातून जो भाग शिकवला. तोच भाग त्याच विद्यार्थ्यांना लक्षात राहात नाही. ज्यातून शिक्षकांनाच त्रास होतो. कारण वर्गात तोच एकच विद्यार्थी नसतो. इतरही विद्यार्थी असतात की ज्यांचे पालक हे विशेषतः आपल्या मुलांकडे जातीनं लक्ष देतात. ते पालक जास्त जागृत असल्यानं शिक्षकांनाही जास्त विचारणा करीत असतात. त्यामुळंच तीही मुलं मागं पडू नये. ही भीती शिक्षकांना वाटते. कारण त्याचा जाब विचारण्यासाठी त्याचे पालक आवर्जून तयार असतात. मग शिक्षकही ज्या विद्यार्थ्यांचं वर्गात सतत विस्मरण होतं. त्या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करतात व जे विद्यार्थी काहीतरी करु शकतात. त्यांच्याकडेच लक्ष देत असतात. ज्यातून जे पालक आपल्या मुलांकडे वेळ देत नाहीत. अशांची मुलं मागं पडतात. महत्त्वपूर्ण बाब ही की पालकांनीही आपल्या पाल्यांकडे लक्ष देण्याची विशेष गरज आहे. आपली मुलं मागं पडू नये यासाठी. काही पालक असे असतात की मला माझ्या मुलाच्या शिक्षणातील काही समजत नाही. मी काय करणार. असेही म्हणतात. परंतु त्यांनी थॉमस अल्वा एडीसनची गोष्ट लक्षात घ्यावी. ज्या थॉमसच्या अशिक्षीत आईनं, त्याला शाळेतून हाकलून लावल्यानंतर आपल्याला काहीच येत नाही. हा विचार करुन जर थॉमसकडे लक्ष दिलं नसतं, तर थॉमस एडीसन शास्त्रज्ञही बनला नसता. दुसरं उदाहरण आहे, शिवाजी महाराजांचं. शिवाजीचे वडील शहाजीराजे हे शिवराय जेव्हा लहान होते, तेव्हा सतत युद्धात गुंतून राहात असत. त्यावेळेस जिजामातेनीच शिवरायांना शिकवलं. हेच उदाहरण नाही तर पुर्वीच्या काळात सतत कोणत्या ना कोणत्या कारणानं बाहेर असणारी पुरुष जात. आईच घरी मुलांना योग्य ते शिक्षण देत असे. त्यांना शिकवीत असे. ज्यातून मुलामुलींचा त्या काळात विकास करता आला. हे एका महिलेनंच केलेलं काम आहे. तेव्हा चूल आणि मूल हीच पद्धती असल्यानं महिलांनी आपल्या मुलांवर संस्कार करण्यासाठी दिलेला वेळ बरोबर होता. आता मात्र समाज सुधारला. आता समानता आल्यानं स्त्री व पुरुष हे दोघेही घटक कामाला जात असतात. माहितच आहे की त्यांच्याकडे आपल्या मुलांकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नाही. परंतु असं जरी असलं तरी सर्वच आईवडीलांनी वेळात वेळ काढून आपल्या पाल्यांकडू पुरेसा तरी वेळ द्यावा. ज्यातून मुलांचा विकास होवू शकेल. यात शंका नाही. तरंच मुलं घडतील व त्यातून कोणी थॉमस एडीसन तर कोणी शिवाजी देखील तयार होवू शकेल. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०



# नको झुलू झोक्यात तुलनेच्या

बऱ्याचदा असे म्हटले जाते की, जीवनात दुःख जास्त आहे व सुख खूप कमी आहे. नेमका जीवनामध्ये दुःखाचा प्रवेश कुठून होतो व सुख नेमके हातातून वाळू सुटल्याप्रमाणे कसे सुटून जाते, हे बऱ्याचदा लक्षात येत नाही. सुख व दुःख दोन्ही अमूर्त, अदृश्य असून हे दोन्ही माणसाला फसवत असतात, असे म्हणण्यापेक्षा, दुःख हे माणूस बरेचदा हाताने ओढवून घेतो, त्याचे कारण म्हणजे आपण आपल्याला लाभलेले अप्रतिम आयुष्य, इतरांना आपण कसे आहोत ते दाखवण्यात खर्च करतो. जीवन जगत असताना तुलनेच्या खूप विचित्र खेळामध्ये, बेडीमध्ये त्याला अडकवून आपण जगतो व नेमके तिथेच आपल्या हातातले सुख दूर निघून जाते. बरेच लोक स्वजीवन स्वतःशी तुलना करून आनंदाने जगतात. परंतु बहुतांशी लोक, आपल्या जीवनाची तुलना इतरांशी करून, तुलनेच्या होडीत बसून जीवनाचा किनारा गाठण्याचा प्रयत्न करतात व दुःख हाताने ओढून घेतात.

रामायणामध्ये असे अनेक पात्र आपल्या लक्षात येतात की, ज्यांनी आपले सुखी जीवन, इतरांसोबत तुलना केल्यामुळे, स्वतः हाताने दुःखात ढकलेले दिसून येते.सुखाचे क्षण तुलना नावाच्या अग्नित माणूस हाताने भस्म करतो व त्याला पदरात दुःख झेलावे लागते व मग माणूस दुःखी होऊन, सुखाला, नशिबाला दोष देत असतो.

तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी असे म्हटल्या प्रमाणे, सुख आपल्या हातात असून, ते आपल्या मानण्यावर असून, केवळ आपण इतरांच्या जीवनाकडे पाहून, व आपल्या सुखाची व्याख्या इतरांसोबत तुलना करून तयार होत असल्याने, आपल्या जीवनात दुःख निर्माण होते. याउलट बऱ्याचदा, एखादा एका डोळ्याने आंधळा माणूस, दोन्ही डोळ्याने आंधळा असलेल्या माणसाकडे पाहून सुद्धा, आनंद व्यक्त करतो किंवा किमान आपल्याला जग पाहायला ईश्वराने एक तरी डोळा दिला आहे यात समाधान मानतो. म्हणजे तो त्याची तुलना दोन्ही डोळे असलेल्या व्यक्तीशी न करता, आहे त्यात समाधान मानतो. महाभारत, रामायण, व इतिहासातील असे अनेक दाखले आपणास देता येतील किंवा असे अनेक पात्र सांगता येतील की ज्यांनी आपली सुखी जीवन केवळ इतरांच्या तुलनेत भस्मसात केले आहेत. आजचा माणूस सुद्धा तेच करताना दिसून येतो आहे.

आजही समाजात जीवन जगताना, अनेक लोक भूतकाळातील त्याच पात्रांचा वारसा, म्हणजेच तुलनेचे जू आपल्या खांद्यावर घेऊन व त्या जुवा खाली आपल्या सुखाची होळी करताना दिसून येतात. बऱ्याचदा आपले जीवन आपल्या पात्र ते व क्षमतेनुसार जगून आपणास सुखी करता येते.परंतु स्व जीवनाची इतरांशी तुलना करून सुखाचे क्षण हाताने वाया घालवल्याने, पदरात केवळ दुःख पडते. आपण आज वर्तमानात सुद्धा भूतकाळातील काही अविवेकी मूल्य घेऊन जगत असल्याने, आपले जीवन दुःखी झाल्याचे लक्षात येते.बऱ्याचदा जीव घेनी तुलना आपल्या जीवनातील आनंद हिरावून घेते व त्यात दुःखाचे रंग भरते. यात नशीब किंवा दैव यांचा दोष नसून, संपूर्णपणे आपला स्वतःचा दोष असतो.आपण सुखी समाधानाने न जगता केवळ मित्रांसोबत, नातेवाईकांसोबत, तुलना करून, आपले आयुष्य जगतो, व इतरांन एवढे किंवा इतरांसारखे आपल्याला नाही मिळाले, तर मग आपल्या जीवनात दुःख आणि दुःख जीवनाच्या वाटेवर पसरत असते.

आपल्या सुखाचा लंबक तुलनेच्या हातात दिल्याने, आयुष्य नावाच्या इमारतीचे बांधकाम बिघडत असते. किंवा आपण वास्तवाला नजरेआड करून, तुलनेच्या झोक्यात बसल्याने आपल्याला तुलनेची हवा नीट व तार्किक पद्धतीने विचार करू देत नाही याचा वाईट परिणाम म्हणून आपल्या जीवनात केवळ दुःखाचा प्रवेश होतो. म्हणून, नको झुलू झोक्यात,

मानवा विचित्र तुलनेच्या,
जातील क्षण निसटून हातून रे,
सुखी जीवनाच्या.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोही पिंपळगावता,
मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# किनवटमध्ये राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी नोटिसा जारी



**किनवट (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ अ (कोठारी ते धनोडा) वरील किनवट परिसरातील रस्त्याच्या हद्दीतील अतिक्रमणांवर अखेर प्रशासनाचा हातोडा पडणार आहे. राष्ट्रीय महामार्ग उपविभाग भोकरच्यावतीने संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. ११ ऑक्टोबरपर्यंत स्वत:हून अतिक्रमणे काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रस्त्यावरील वाढते अपघात रोखण्यासोबतच सुरक्षेच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. याच धर्तीवर नांदेड जिल्हाधिकाऱ्यांच्या प्राप्त पत्रानुसार ही कारवाई केली जात आहे. पत्रानुसार किनवट-माहूर रस्त्यावरील अय्यपा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरील ३० मीटर हद्दीतील (रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर) अतिक्रमणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते अशोक स्तंभ या मार्गावरील १८ मीटर हद्दीतील (रस्त्याच्या मध्यापासून ९ मीटर) अतिक्रमणे काढून घेण्याबाबत सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सर्व अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्यात आल२या आहेत.

प्रशासनाने बजावलेल्या नोटीसनुसार ११ ऑक्टोबरपर्यंत अतिक्रमणे स्वत:हून न हटवल्यास दि.१२ ऑक्टोबरपासून प्रशासकीय यंत्रणेमार्फत बुलडोझर चालवून अतिक्रमणे हटवण्यात येतील.तसेच या कारवाईसाठी येणारा सर्व खर्च आणि इतर कायदेशीर जबाबदारी संबंधित अतिक्रमणधारकांचीच असेल, असा स्पष्ट इशारा राष्ट्रीय महामार्ग उपविभाग भोकरचे उपविभागीय अधिकारी यांनी दिला आहे.

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन, तहसील कार्यालय, महावितरण आणि संबंधित कंत्राटदार कंपनीला आवश्यक यंत्रसामग्री सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अतिक्रमणे हटविण्याबाबत प्रशासनाने संबंधित मालमत्ताधारक कोण याची खातरजमा न करता सरसकट फर्म, दुकानांच्या नावे मोघम स्वरूपाच्या नोटिसा बजावल्या आहेत. यामुळे प्रत्यक्ष अतिक्रमणे हटविताना प्रशासनाला कसरत करावी लागणार आहे.

## नांदेडमध्ये आजपासून कनकेश्वरी देवींच्या 'गुरु महिमा सत्संगा'चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सद्गुरू सेवा समितीच्या वतीने शहरातील



डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह येथे महामंडलेश्वर श्री कनकेश्वरी देवी यांच्या उपस्थितीत 'गुरु महिमा सत्संग' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आध्यात्मिक सोहळा ६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह नांदेड येथे होणार आहे.

या सत्संगाच्या माध्यमातून नांदेड व परिसरातील भाविकांना महामंडलेश्वर श्री कनकेश्वरी देवी यांच्या मुखातून गुरु महिमा, अध्यात्मिक विचार आणि जीवनमूल्यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या सोहळ्याबाबत भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सद्गुरू सेवा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्संग सोहळ्याचा लाभ नांदेड शहरासह परिसरातील अधिकाधिक भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## कवयित्री पडलवार यांच्या कवितेतून स्त्रीच्या अस्मितेचा बुलंद स्वर -डॉ. जगदीश कदम

### उज्ज्वला पडलवार यांच्या 'विद्रोह प्रेमाचा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रेम हा केवळ भावनेचा विषय नसून तो मानवी जगण्याशी आणि सामाजिक वास्तवाशी जोडलेला व्यापक अनुभव आहे. पुरुषप्रधान चौकटींना छेद देत कवयित्री उज्ज्वला पडलवार यांच्या कवितेतून स्त्रीच्या अस्मितेचा बुलंद स्वर उमटतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रवीण पाटील होते. यावेळी कवी शिवाजी अंबुलगेकर व कॉ. विजय गाभणे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. कदम यांनी पडलवार यांच्या कविता आत्मसमर्पण करणाऱ्या नसून स्वतःचा शोध घेणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध प्रश्न उपस्थित करणाऱ्या असल्याचे सांगितले.डॉ. प्रवीण पाटील यांनीही बदलती जातपात व्यवस्था आणि शोषितांच्या प्रश्नांवर या काव्यसंग्रहातून संवेदनशील भाष्य झाल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभीदा प्रकाशनच्या प्रा. डॉ. विजया दाढेल यांनी केले, तर सूत्रसंचालन राम तरटे यांनी केले. आभार डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी मानले. या सोहळ्यास नांदेडमधील साहित्यिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कलाल समाजाच्यावतीने विशेष सत्कार**

कवयित्री उज्ज्वला पडलवार यांच्या 'विद्रोह प्रेमाचा' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या निमित्ताने कलाल समाजाच्या वतीने कवयित्री उज्ज्वला पडलवार यांचा सत्कार करून त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय कलाल, गौड समाज युवा संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल अनंतवार यांच्या पुढाकाराने कलाल समाजाच्या वतीने कवयित्री उज्ज्वला पडलवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना सुनिल अनंतवार म्हणाले, उज्ज्वला पडलवार यांचा 'विद्रोह प्रेमाचा' हा केवळ कवितासंग्रह नाही, तर प्रेम, स्त्री-अस्मिता, सामाजिक वास्तव, संघर्ष आणि मानवी संवेदनांना शब्द देणारा साहित्यिक आवाज आहे. आपल्या समाजातील प्रतिभेला आणि साहित्यिकांना प्रोत्साहन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. उज्ज्वला पडलवार यांनी आपल्या लेखणीतून समाजाच्या जिवंत प्रश्नांना भिडण्याचे धाडस केले असून त्यांच्या या साहित्यिक योगदानाचा कलाल समाजाला निश्चितच अभिमान आहे.

त्यांच्या लेखणीतून व्यक्त होणाऱ्या संवेदना आणि विद्रोही विचारांना समाजाने वाचले, समजून घेतले आणि पुढे नेले पाहिजे. 'प्रेमाचा विद्रोह' या काव्यसंग्रहाला वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळेल आणि उज्ज्वला पडलवार यांची साहित्यिक वाटचाल अधिक समृद्ध होईल, असा विश्वास आहे, असेही सुनिल अनंतवार यांनी सांगितले.

## पंतोजी सोमठाणकर यांची तालुकाध्यक्षपदी निवड

**उमरी (प्रतिनिधी)–** नांदेड येथे ४ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय आदिवासी मनेरवारलू महासंघाची बैठक आयोजित



करण्यात आली होती. या बैठकीत जिल्हा व तालुकानिहाय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये उमरी तालुक्याच्या तालुकाध्यक्षपदी पंतोजी बालाजीराव सोमठाणकर यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली.

पंतोजी सोमठाणकर यांनी गेल्या वीस वर्षांपासून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी तसेच समाजहितासाठी सातत्याने कार्य केले आहे. समाजातील विविध अडीअडचणी सोडविण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असून, जाती-पातीच्या पलीकडे जाऊन सर्व समाजघटकांना सोबत घेऊन काम करणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे.

## बेलदार समाजाची नांदेड तालुका कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** बेलदार समाज विकास संस्थेच्या नांदेड तालुकाध्यक्षपदी शरद बुरपल्ले, उपाध्यक्षपदी मीनाक्षी सगर तर सचिवपदी लक्ष्मण वडमिले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



निळा रोड येथील अनिल लॉन्स येथे संस्थेचे अध्यक्ष राम आचेमवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाजरत्न कोंडीबा बुरपल्ले, संस्थेचे सचिव आत्माराम वग्गावाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

तालुका कार्यकारिणीत सहसचिवपदी ॲड. गोविंद गुजरवाड, कोषाध्यक्षपदी आरती गोणे, तर सदस्यपदी गणेश राऊतवार, रवींद्र सगर, लक्ष्मण आचेमवाड, साईनाथ मंदावाड, अंतेश्वर मंडले, बालाजी मंदावाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

बेलदार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यात समाजबांधवांनी संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी प्रमुख पाहुणे कोंडीबा बुरपल्ले यांनी व्यक्त केले. त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव आत्माराम वग्गावाड यांनी प्रस्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा सादर करून निवड प्रक्रिया पार पाडली.

नवनिर्वाचित उपाध्यक्ष मीनाक्षी सगर, लक्ष्मण वडमिले, ॲड. गोविंद गुजरवाड, नारायण गोणे यांनी मनोगत व्यक्त करून समाजकार्य पुढे नेण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष आमनवाड यांनी केले, तर आभार प्रल्हाद आयनेले यांनी मानले. कार्यक्रमास नांदेड शहर व तालुक्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ. ज्ञानेश्वर वडमिलवार यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिली.

## यशवंतराव चव्हाण विचार मंचचा प्रबोधनपर कार्यक्रम

### सौ. लताबाई शिंदे यांच्या स्मरणार्थ सौ. कल्पनाताई मेथे यांना आदर्श गृहदेवता' सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–**प्रा. नारायण शिंदे यांच्या सहचारिणी दिवंगत सौ. लताबाई शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण विचारमंचच्या वतीने प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केवळ 'सुवासिनींचे जेवण' असा औपचारिक कार्यक्रम न करता विचारमंचच्या वतीने म हिलांना वैचारिक मेजवानी देण्यात आली. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध लेखिका प्रा. डॉ. सौ. मथुताई सावंत आणि प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्या सुविद्य पत्नी सौ. वंदनाताई शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. अविधवा नवमीचे औचित्य साधून यावेळी विचारमंचाच्या स्मृतिचिन्हाची



(नांगर व ग्रंथ असलेले प्रतीक) पूजा करण्यात आली.

या वैचारिक प्रबोधनाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सौ. मथुताई सावंत यांचे सौ. गीतांजली रत्नाकर शिंदे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सौ. कल्पनाताई गोविंदराव मेथे यांनी आपल्या तीन मुलांना उच्चशिक्षित करण्यासाठी अपार परिश्रम घेतले. तसेच आपले कुटुंब एकविचाराने एकसंघ राहिले पाहिजे यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली, याबद्दल सौ. कल्पनाताई मेथे यांना सौ. लताबाई शिंदे यांच्या स्मरणार्थ 'आदर्श गृहदेवता' म्हणून सौ. मथुताई सावंत व सौ. वंदनाताई शिंदे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सौ. स्मिता महेश गव्हाणे यांनी 'मोबाईलचा अतिवापर आणि त्याचे संसारावरील दुष्परिणाम' तसेच 'महिलांमधील अंधश्रद्धा आणि कौटुंबिक गैरसमज' या विषयावर सविस्तर विचार मांडले. प्रमुख अतिथी सौ. मथुताई सावंत यांनी मार्गदर्शन करताना, बदलत्या काळानुसार स्त्रियांनी आपली वैचारिक भूमिका बदलली पाहिजे आणि विविध ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. आपल्या संसारात आपले माहेर आवश्यकतेपेक्षा अधिक डोकावणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. तसेच विविध क्षेत्रांत सक्रिय सहभागी होऊन महिलांनी आपल्या भूमिका आणि अनुभव लिहिले पाहिजेत, असे मत व्यक्त केले.

## 'समरगंध'ला तापी-पूर्णा राष्ट्रीय उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवचरण उज्जैनकर फाऊंडेशन, जळगाव यांच्या वतीने आयोजित चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनात कवयित्री अंजली कानिंदे यांच्या 'समरगंध' या कवितासंग्रहाला 'तापी-पूर्णा राष्ट्रीय उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

अभिजात मराठी गौरव दिनाच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज साहित्यनगरी व आदिशक्ती मुक्ताई व्यासपीठावर शनिवारी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'समरगंध'ला मिळालेला हा पहिलाच राष्ट्रीय पुरस्कार आहे.

## उमरी शहरातील ३० भटक्या श्वानांचे लसीकरण व उपचार

**उमरी (प्रतिनिधी)** –नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. शकुंतला भगवान मुदिराज व उपाध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याधिकारी श्रीमती सोनाली बसवाल यांच्या नियंत्रणात उमरी शहरातील भटक्या श्वानांना पकडून त्यांच्यावर लसीकरण व आवश्यक उपचार प्रक्रिया करण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत शहरातील नवीन डॉ. आंबेडकर नगर परिसर, नागझरी, व्यंकटेश नगर परिसर, सदानंद बाबा महाराज मंदिर परिसर, बाजार गल्ली, साईबाबा गल्ली तसेच डॉ. आंबेडकर नगर, पोलीस स्टेशन परिसर जुने गाव परिसरातील एकूण ३० भटक्या श्वानांना प्रशिक्षित पथकाच्या मदतीने सुरक्षितरीत्या पकडून त्यांचे लसीकरण व आवश्यक उपचार प्रक्रिया करण्यात आली.



या मोहिमेत नगर परिषद उमरीचे माधव जमदाडे, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता, कैलास यमेलवाड अभियंता, गणेश मदने वरिष्ठ लिपीक, आकाश खंदारे पाणीपुरवठा व स्वच्छता सहायक तसेच नगर परिषदेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

भटक्या श्वानांपासून नागरिकांना होणारा त्रास कमी करणे, रेबीजसारख्या आजारांचा प्रसार रोखणे तसेच श्वानांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. शहरातील इतर भागांतही ही मोहीम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.

नागरिकांनी या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. शकुंतला भगवान मुदिराज, उपाध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर व मुख्याधिकारी श्रीमती सोनाली बसवाल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वडिलांचे छत्र हरवलेल्या ओंकारला डॉक्टर होण्यासाठी काँग्रेसचे तिरुपती पाटील कोंढेकर यांची ५१ हजार रूपये मदत



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शिक्षण हे असे शस्त्र आहे, ज्याच्या जोरावर आपण जग बदलू शकतो. या विचाराला सार्थ ठरवत जिद्द, चिकाटी आणि आईच्या अपार कष्टांच्या जोरावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तालुक्यातील देगाव येथील ओंकार नागोराव जाधव या गुणवंत विद्यार्थ्याने एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणापर्यंत मजल मारली आहे. मात्र, वैद्यकीय शैक्षणिक फी व वसतिगृह मेसचा खर्च पेलणे अशक्य झाल्याने त्याच्यावर शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ आली होती. काँग्रेसचे नेते तिरूपती (पप्पू) पाटील कोंढेकर यांनी पुढाकार घेऊन ओमकारला ५१ हजार रुपयांची मदत केली.

ओंकारच्या कुटुंबाला या कठीण परिस्थितीत आधार देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सेवाभावी संस्था आणि लोकप्रतिनिधींनी पुढे येऊन या गुणवंत विद्यार्थ्याच्या वैद्यकीय शिक्षणासाठी मदतीचा हात द्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

एका गुणवंत विद्यार्थ्याचे डॉक्टर होण्याचे स्वप्न केवळ आर्थिक अडचणीमुळे थांबू नये. समाजातील प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने आपल्या परीने हातभार लावावा यासाठी काँग्रेसचे नेते पप्पू पाटील कोंडेकर यांनी पुढाकार घेऊन ५१ हजार रुपयाची मदत केली. तसेच ओंकारचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होईल, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## लोहा मुख्य चौकात हायमॅक्सचा झगमगाट; सुनेगाव तलावापर्यंत स्ट्रीट लाईट

### आ. चिखलीकरांचा पुढाकार; शहराच्या वैभवात भर

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरील विद्युत खांब हटविण्यात येणार आहेत. तसेच मुख्य चौक ते सुनेगाव तलावापर्यंत (शहराची हद्द) नवीन झालेल्या चौपदरी सिमेंट रस्त्याच्या दुभाजकात 'स्ट्रीट लाईट' आणि मुख्य चौकाच्या मध्यभागी भगवा ध्वज व हायमॅक्स बसविण्यात येणार असून, त्याबाबत तातडीने कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिले आहेत. या व अन्य सुरू असलेल्या कामामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे



आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विधानसभा व नगरपालिका निवडणूक काळात शहरवासीयांना जे आश्वासन दिले होते त्याची पूर्तता करण्यासाठी त्याचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. हा शहराच्या वैभवात भर पाडणारा लोहा-पालम-गंगाखेड सिमेंट रोड शहराच्या हद्दीपर्यंत चौपदरी करावा असे निर्देश संबंधिताना दिले होते. त्यानुसार हे काम पूर्णत्वास गेले आहे. त्यावर दुभाजक करण्यात आले. त्याचे सुशोभिकरण व स्ट्रीट लाईट उभारण्यात येणार आहे

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणाचे काम लवकर पूर्ण करणे, समोरील विद्युत खांब हटवावे असे आ. प्रतापराव पाटील यांनी संबंधित गुत्तेदार व वीज मंडळाला सांगितले.

मुख्य चौकातील सुशोभिकरण, हायमॅक्स उभारणी येत्या पंधरा दिवसात पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश दिले. नगराध्यक्ष शरद पवार यांनी या चौक व दुभाजकातील स्ट्रीट लाईट तसेच अन्य महत्वाच्या कामाबाबत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याशी चर्चा केली व त्या अनुषंगाने संकल्पना सांगितली. उपस्थित प्रमुख कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना आ. चिखलीकर यांनी त्या त्या विभागाला दिल्या.

रविवार, दि. ४ ऑक्टो. रोजी दुपारी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण, परिसरातील कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्यासोबत माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, तहसीलदार परळीकर, नगराध्यक्ष शरद पवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी नगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, गटनेते भास्कर पवार नगरसेवक गणेश बगाडे, सतीश निखाते, दत्ता शेटे, अनिल धुतमल, बाळू पवार, खंडू पवार, कार्यकर्ते उपस्थित होते.

## लियाफी स्थापना दिनानिमित्त नांदेड विभागीय मेळावा उत्साहात

### हजारो विमा प्रतिनिधींची उपस्थिती : मान्यवरांचे मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** लाइफ इन्शुरन्स एजंट फेडरेशन ऑफ इंडिया (लियाफी) च्या स्थापना दिनानिमित्त २ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे लियाफीचा विभागीय मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यास नांदेड विभागातील नांदेड, हिंगोली, परभणी, आणि जालना जिल्ह्यातील हजारो विमाप्रतिनिधी उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि महापुरुषाच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. त्यानंतर निगम गीत व लियाफी गीत सादर करण्यात आले. या विभागीय मेळाव्यात विमाप्रतिनिधीचे प्रश्न, संघटनेची भूमिका आणि त्यांच्या हिताच्या विविध प्रश्नावर मार्गदर्शन करण्यात आले. मेळाव्यास लियाफीचे अध्यक्ष रणवीर शर्मा व माजी ईसी मेंबर बाबूलाल मुंदडा आदी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

तसेच भारतीय आयुर्विमा महामंडळाचे नांदेड विभागाचे वरिष्ठ मंडळ प्रबंधक अभय कुलकर्णी आणि विपणन प्रबंधक टी रामचंद्र यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली.

याप्रसंगी नांदेड विभागाच्या कोषाध्यक्षपदी सुरेश मिटकरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांना राष्ट्रीय अध्यक्ष रणवीर शर्मा व बाबुलाल मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी लियाफी पश्चिम क्षेत्राचे उपाध्यक्ष सुरेश शेळके, पश्चिम क्षेत्र लियाफीचे सी. एल. आय. ए कन्व्हेनर दीपक जी काळे, लियाफी नांदेड विभागाचे अध्यक्ष कैलासजी भुतेकर, सचिव शेख एजास यांच्यासह नांदेड विभागाचे सर्व पदाधिकारी आणि नांदेड विभागातील सर्व शाखेचे पदाधिकारी तसेच नांदेड विभागातील सर्व विमा प्रतिनिधी बंधू आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थापना दिनाच्या निमित्ताने झालेल्या विभागीय मेळाव्यामुळे विमा प्रतिनिधींमध्ये संघटनात्मक एकजूट दिसून आली.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# हदग्याचं मूल्यवर्धन

## पारंपरिक औषधी वनस्पतीला आधुनिक अन्नप्रक्रियेची जोड; प्रथिने, खनिजे आणि अँटीऑक्सिडंटने समृद्ध सूप प्रीमिक्स

**ग्रामीण महाराष्ट्राच्या आहारसंस्कृतीत सहज आढळणारा हदगा म्हणजे केवळ शोभेचे झाड नव्हे, तर पोषणमूल्यांनी समृद्ध अशी पारंपरिक वनस्पती. शुभ्र, लाल किंवा गुलाबी फुलांनी बहरणाऱ्या हदग्याला आपल्या आहारात आणि पारंपरिक उपचारपद्धतीत महत्त्वाचे स्थान आहे. आता याच हदग्याच्या फुलांना आधुनिक अन्नतंत्रज्ञानाची जोड मिळाली असून, त्यापासून पौष्टिक सूप प्रीमिक्स तयार करण्याचा प्रयोग करण्यात आला आहे.**

हदगा या वनस्पतीच्या फुलांमध्ये विविध जैवसक्रिय घटक, अँटीऑक्सिडंट, अँटिमायक्रोबियल आणि दाहविरोधी गुणधर्मांशी संबंधित संयुगे आढळतात. या गुणधर्मांचा विचार करून अन्नतंत्र विभागातील बी.टेक. विद्यार्थी वैष्णवी मुंढे, ओमकार वडगावकर आणि ऋषिकेश मुसळे यांनी हदग्याच्या फुलांपासून सूप प्रीमिक्स तयार करण्याचा प्रायोगिक उपक्रम हाती घेतला.

### फुलात दडलेली पोषणशक्ती

हदग्याच्या फुलांमध्ये फ्लॅव्होनॉइड्स, फेनोलिक संयुगे आणि जीवनसत्त्व क यांसारखे अँटीऑक्सिडंट घटक आढळतात. शरीरातील मुक्त रॅडिकल्समुळे होणारा ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास हे घटक सहाय्यभूत ठरू शकतात. याशिवाय फुलांमध्ये विविध जैवसक्रिय संयुगे असून त्यांना सूक्ष्मजीवविरोधी आणि दाहविरोधी गुणधर्मांशी जोडले जाते. त्यामुळे पारंपरिक आहारातील हदग्याच्या फुलांकडे आता केवळ भाजी किंवा खाद्यपदार्थ म्हणून नव्हे, तर मूल्यवर्धित अन्नपदार्थांसाठीच्या कच्च्या मालाच्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे.

### फुलांपासून सूपपर्यंतचा प्रवास

सूप प्रीमिक्स तयार करण्यासाठी प्रथम हदग्याची ताजी फुले हाताने गोळा करून स्वच्छ पाण्याने धुतली जातात. त्यानंतर फुलांवर १० टक्के सोडियम कार्बोनेट द्रावणाची प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेमुळे रंग, सुगंध आणि काही जैवसक्रिय घटक टिकवून ठेवण्यास मदत होते. त्यानंतर फुले सावलीत वाळवून त्यातील आर्द्रता सुमारे १० टक्क्यांपर्यंत आणली जाते. वाळलेल्या फुलांची बारीक पूड तयार केली जाते. ही पूड पुढे मूगडाळ, हरभरा डाळ आणि उडीद डाळींपासून तयार केलेल्या सूप प्रीमिक्समध्ये मिसळली जाते. चव आणि सुगंधासाठी काळी मिरी, जिरे, आले, लसूण, धनेपूड आणि मीठ यांचा वापर केला जातो. विशेष म्हणजे या प्रयोगातील सूप प्रीमिक्समध्ये कृत्रिम संरक्षकांचा वापर करण्यात आलेला नाही.

### दोन-तीन मिनिटांत सूप तयार

या प्रीमिक्सचा वापरही सोपा आहे. सुमारे १० ग्रॅम सूप प्रीमिक्स १०० मिलिलिटर पाण्यात मिसळून दोन ते तीन मिनिटे गरम करायचे. एक उकळी आल्यानंतर पौष्टिक सूप तयार.म्हणजेच पारंपरिक वनस्पतीचा आधुनिक आणि सोयीस्कर आहारपदार्थात केलेला हा प्रयोग ग्रामीण भागातील स्थानिक खाद्यपदार्थांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो.

» सूपमध्ये अँटीऑक्सिडंट्सचा ठेवा : सूप प्रीमिक्सच्या पोषणमूल्याच्या परीक्षणात त्यामध्ये अँटीऑक्सिडंट घटक, फेनोलिक आणि फ्लॅव्होनॉइड संयुगे तसेच जीवनसत्त्व क आणि ब आढळले. यासोबतच लोह, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम आणि झिंक यांसारखी आवश्यक खनिजेही असल्याचे परीक्षणात दिसून आले. फुलांमधील जैवसक्रिय घटक आणि डाळींमधील पोषक घटक यांचा एकत्रित वापर केल्यामुळे या सूप प्रीमिक्सला पोषणाच्या दृष्टीने वेगळे स्थान मिळू शकते.

» डाळींमुळे प्रथिनांचीही भर : मूग, हरभरा आणि उडीद या डाळींचा समावेश केल्यामुळे सूपमध्ये प्रथिनांचे प्रमाण वाढते. डाळींमधील प्रथिनांमुळे अमिनो आम्लांचे संतुलन सुधारण्यास आणि आहाराचे पोषणमूल्य वाढवण्यास मदत होते. त्यामुळे हदग्याच्या फुलांची पोषणशक्ती आणि डाळींचे प्रथिनमूल्य यांची सांगड घालणारा हा सूप प्रीमिक्स पारंपरिक अन्नाला आधुनिक मूल्यवर्धन देणारा प्रयोग ठरतो.

» गावच्या हदग्याला बाजारपेठेची वाट : हदग्याची फुले सहज उपलब्ध असूनही त्यांचा मूल्यवर्धित अन्नपदार्थ म्हणून मोठ्या प्रमाणावर वापर झालेला नाही. या प्रयोगामुळे स्थानिक पातळीवर हदग्याच्या फुलांचे संकलन, वाळवण, पावडरनिर्मिती आणि सूप प्रीमिक्स तयार करण्याचा छोटा उद्योग उभा करण्याची शक्यता निर्माण होते. महिला बचत गट, ग्रामीण उद्योजक, शेतकरी गट आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून अशा उत्पादनांची निर्मिती केली तर स्थानिक वनस्पतीला बाजारपेठ आणि ग्रामीण भागाला रोजगार मिळू शकतो.



» पारंपरिक ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड : हदगा आपल्या पारंपरिक आहाराचा भाग आहे. मात्र बदलत्या जीवनशैलीत अशा स्थानिक आणि पौष्टिक वनस्पतींचा वापर कमी होत चालला आहे. त्यामुळे पारंपरिक ज्ञान जपतानाच त्याला आधुनिक अन्नप्रक्रिया, आकर्षक स्वरूप आणि सोयीस्कर वापराची जोड देणे गरजेचे आहे. हदग्याच्या फुलांपासून तयार झालेले सूप प्रीमिक्स याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. ज्या फुलांकडे आजवर दुर्लक्ष झाले, त्याच फुलातून उद्याचा पौष्टिक आणि मूल्यवर्धित ग्रामीण उद्योग उभा राहू शकतो.

# फुलांना सुगंधापुरते मर्यादित ठेवू नका!

अत्तर, सुगंधी तेलापासून नैसर्गिक रंग अन् हर्बल उत्पादनांपर्यंत मोठी बाजारपेठ

**शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला मूल्यवर्धनाची जोड**

**फुलांचे आयुष्य क्षणभंगुर! शेतातून काढणी केल्यानंतर काही तासांतच ती बाजारात पोहोचली नाहीत तर लाखो रुपयांची फुले अक्षरशः कचऱ्यात जाण्याची वेळ येते. मात्र, याच नाजूक फुलांना मूल्यवर्धनाची जोड दिली तर त्यांचा सुगंध थेट अर्थकारणाला चालना देऊ शकतो. अत्तर, सुगंधी तेल, नैसर्गिक रंग, गुलकंद, सुगंधी पाणी, हर्बल चहा, सौंदर्यप्रसाधने आणि जैविक खते अशा असंख्य उत्पादनांच्या माध्यमातून फुलशेतीला नवा उद्योग मिळू शकतो.**



पूजाअर्चा, सजावट आणि सण-उत्सवांमुळे फुलांना विशिष्ट काळात मोठी मागणी असते. मात्र, केवळ ताजी फुले विकण्यावर अवलंबून राहिल्यास बाजारभावातील चढ-उतार आणि नाशवंतपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. फुलांवर प्रक्रिया करून तयार केलेली मूल्यवर्धित उत्पादने मात्र अधिक काळ टिकतात आणि त्यांना देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठ उपलब्ध होते. फुलशेती, प्रक्रिया उद्योग आणि निर्यात या तिन्ही क्षेत्रांना जोडणारे हे अर्थकारण ग्रामीण भागासाठी रोजगाराची नवी दारे उघडणारे ठरू शकते. विशेषतः सेंद्रिय, नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक उत्पादनांकडे ग्राहकांचा वाढता कल पाहता या क्षेत्रात मोठी संधी आहे.

### सुकलेल्या फुलांतही कमाईचा सुगंध

फुले सुकवून त्यांचा वापर सजावट, शुभेच्छापत्रे, बुकमार्क, हस्तकला वस्तू आणि भेटवस्तू तयार करण्यासाठी करता येतो. सुकलेली फुले दीर्घकाळ टिकत असल्याने त्यांना बाजारपेठही मिळते. अल्प भांडवलात घरगुती पातळीवर सुरू करता येणारा हा व्यवसाय महिलांसाठीही रोजगाराचे प्रभावी साधन ठरू शकतो.

### अत्तर, सुगंधी तेलाची बाजारपेठ

गुलाब, मोगरा, लव्हेंडर, चंपा यांसारख्या सुगंधी फुलांपासून नैसर्गिक अत्तर आणि सुगंधी तेल तयार करता येते. परफ्युम, साबण, सौंदर्यप्रसाधने आणि अरोमाथेरपी उद्योगात या उत्पादनांचा वापर होतो. रासायनिक उत्पादनांपेक्षा नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांना ग्राहकांची पसंती वाढत असल्याने फुलांपासून तयार होणाऱ्या अत्तराला देश-विदेशात मोठी बाजारपेठ निर्माण होत आहे.

### फुलांतून नैसर्गिक रंगांची निर्मिती

झेंडू, गुलाब, शेवंती आणि हिबिस्कस यांसारख्या फुलांपासून नैसर्गिक रंग तयार करता येतात. वस्त्रोद्योग, खाद्यपदार्थ आणि सौंदर्यप्रसाधनांमध्ये या रंगांचा वापर होतो. रासायनिक रंगांमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता नैसर्गिक रंगांना भविष्यात आणखी मोठी मागणी मिळण्याची शक्यता आहे.

### गुलकंदापासून हर्बल चहापर्यंत

फुलांचा उपयोग केवळ देवपूजा आणि सजावटीपुरता मर्यादित राहिलेला नाही. गुलकंद, सिरप, जॅम, हर्बल चहा आणि विविध पेये तयार करण्यासाठीही फुलांचा वापर केला जातो. आरोग्याबाबत जागरूक ग्राहकांमध्ये नैसर्गिक आणि हर्बल उत्पादनांची मागणी वाढत असल्याने या उत्पादनांना बाजारपेठ मिळत आहे. वाळलेल्या फुलांपासून तयार होणारा हर्बल चहा हा त्यातील एक महत्त्वाचा प्रकार. गुलाब, हिबिस्कस, जाई, कॅमोमाइल आणि लव्हेंडर यांसारख्या फुलांपासून विविध प्रकारचे चहा तयार करता येतात. कमी प्रमाणात उत्पादन सुरू करून स्थानिक बाजारपेठेत विक्री करण्याचीही संधी उपलब्ध आहे.

### सौंदर्यप्रसाधनांत फुलांचा सुगंध

फुलांच्या अर्काचा वापर फेसक्रीम, फेसपॅक, साबण, लोशन, परफ्युम आणि इतर सौंदर्यप्रसाधनांमध्ये केला जातो. गुलाबजल, फुलांच्या अर्काचे साबण, बॉडी लोशन, हिबिस्कस तेल व शाम्पू, लव्हेंडर आणि जाईयुक्त केसांचे तेल, नैसर्गिक अत्तर, सुगंधी तेल, हर्बल डिओडोरंट आणि स्प्रे अशी अनेक उत्पादने तयार करता येतात. म्हणजेच फुलांचा व्यवसाय फुलांच्या बाजारातच थांबत नाही; तो सौंदर्यप्रसाधने, अन्नप्रक्रिया, औषधी उत्पादने, सुगंधी द्रव्ये आणि निर्यातीपर्यंत पोहोचतो.

### शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्नाची वाट



फुले नाशवंत असल्यामुळे बाजारपेठेवर पूर्ण अवलंबून राहणे हा शेतकऱ्यांसाठी मोठा धोका आहे. मात्र, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनामुळे फुलांचा टिकाऊ माल तयार होतो. त्यामुळे बाजारभावातील चढ-उतारांचा धोका कमी करण्यास मदत होते. फुलांना केवळ तोडून बाजारात नेण्याऐवजी त्यांच्यावर प्रक्रिया करून उत्पादन विकले, तर शेतमालाची किंमत अनेक पटींनी वाढवण्याची संधी निर्माण होते. त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याबरोबरच ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग, महिला बचतगट आणि लघुउद्योगांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. नैसर्गिक, सेंद्रिय आणि पर्यावरणपूरक उत्पादनांकडे जगाचा कल वाढत आहे. त्यामुळे भारतातील फुलशेतीला केवळ स्थानिक बाजारपेठेपुरते मर्यादित न ठेवता मूल्यवर्धन, प्रक्रिया आणि निर्यातीशी जोडण्याची हीच योग्य वेळ आहे.

# निर्माल्य नव्हे, कमाईचा कच्चा माल!

## झेंडूच्या फुलांत दडली जैवसंपत्ती; ल्युटीन, प्रीबायोटिक्सपासून जैवखतापर्यंत मूल्यनिर्मितीची नवी वाट



**सण-उत्सव आले की देवाच्या चरणी वाहिलेला झेंडू, मंदिरांची सजावट आणि धार्मिक कार्यक्रमांतील फुलांचा सडा दिसतो. मात्र पूजा संपली की हेच फूल निर्माल्याच्या ढिगात जाते. अनेकदा हे निर्माल्य थेट कचऱ्यात किंवा जलस्रोतांमध्ये फेकले जाते. काही तासांपूर्वी पूजनीय आणि मौल्यवान असलेले फूल अचानक कचरा का ठरावे, हा प्रश्न आता विज्ञानाने उपस्थित केला आहे. कारण झेंडूच्या फुलात कचरा नसून ल्युटीन, नैसर्गिक रंगद्रव्ये, जैवसक्रिय घटक आणि तंतूंची मौल्यवान जैवसंपत्ती दडलेली आहे. झेंडूच्या फुलांचा हा प्रवास आता निर्माल्यापासून मूल्यनिर्मितीकडे वळू शकतो. योग्य तंत्रज्ञानाच्या मदतीने एका टाकाऊ फुलातून एक नव्हे तर ल्युटीन, प्रीबायोटिक्स आणि अखेरीस जैवखत अशी अनेक उत्पादने तयार करण्याची दिशा विकसित झाली आहे.**



### फुलांचा कचरा की सोन्याची खाण?

झेंडू म्हणजे पूजा, सजावट आणि उत्सव एवढीच त्याची ओळख नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर या फुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर जैविक पदार्थ, नैसर्गिक रंगद्रव्ये, आहारातील तंतू आणि जैवसक्रिय घटक आहेत. थेट कंपोस्ट करून या फुलांची विल्हेवाट लावणे हा एक पर्याय आहे; मात्र त्यातील मौल्यवान घटक आधी बाहेर काढून उर्वरित जैवभाराचा उपयोग केला तर त्यातून कितीतरी पटीने अधिक मूल्य निर्माण होऊ शकते. 'वेस्ट टू व्हॅल्यू'पेक्षा 'वेस्ट टू मल्टिपल व्हॅल्यू' ही ग्रीन बायोरिफायनरीची संकल्पना याच ठिकाणी महत्त्वाची ठरते.

### पिवळ्या रंगामागे 'ल्युटीन'ची ताकद

झेंडूच्या फुलांचा पिवळा-केशरी रंग केवळ डोळ्यांना आकर्षक वाटत नाही, तर त्यामागे मौल्यवान कॅरोटिनॉइड रंगद्रव्ये आहेत. त्यापैकी ल्युटीन हा महत्त्वाचा घटक आहे. न्यूट्रास्युटिकल्स, आरोग्यपूरक उत्पादने आणि कुक्कुटपालनात नैसर्गिक रंगद्रव्य म्हणून ल्युटीनला मोठी मागणी आहे. त्यामुळे आजपर्यंत सजावटीपुरता मर्यादित असलेला झेंडू उच्च-मूल्याच्या जैविक घटकाचा नैसर्गिक स्रोत बनू शकतो. फुलात ल्युटीन आहे; पण ते सहज हातात येत नाही. पेशींच्या संरचनेत हा घटक अडकलेला असल्याने केवळ फुलांची पावडर करून अपेक्षित प्रमाणात ल्युटीन मिळवणे शक्य होत नाही. यासाठी पेशींची रचना सैल करून आत दडलेले घटक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्वाहा सेंटर ऑफ एक्सलन्स, व्हीएनआयटी नागपूर येथील डीएसटी यंग सायंटिस्ट डॉ. इप्सिता चक्रवर्ती यांनी विकसित केलेल्या एन्झाइम- आधारित प्रक्रियेतून यावर उपाय शोधण्यात आला आहे. एन्झाइमच्या उपचारामुळे फुलांच्या पेशीभित्तिकेतील जटिल घटकांचे विघटन होते आणि ल्युटीन पुढील निष्कर्षणासाठी अधिक उपलब्ध होते. प्रयोगांमध्ये या प्रक्रियेनंतर ल्युटीनची उपलब्धता ४८ मायक्रोग्रॅम प्रतिग्रॅमवरून १०० मायक्रोग्रॅम प्रतिग्रॅमपर्यंत वाढल्याचे आढळले. म्हणजेच, त्याच जैवभारातून मिळणाऱ्या ल्युटीनचे प्रमाण जवळपास दुप्पट झाले. यानंतर पर्यावरणपूरक पद्धतीने ल्युटीनचे निष्कर्षण करून त्यापासून न्यूट्रास्युटिकल उत्पादन विकसित करण्यात आले आहे. डॉ. अनूपमा कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित झालेली ही दिशा झेंडूच्या फुलांना उच्च-मूल्याच्या उत्पादनात रूपांतरित करण्याची क्षमता दाखवते.

» ल्युटीन काढले तरी फूल संपत नाही! : झेंडूच्या फुलातील ल्युटीन काढले म्हणजे उरलेला जैवभार पुन्हा कचरा ठरेल, असे नाही. उलट त्यात मोठ्या प्रमाणात तंतू आणि जटिल कार्बोहायड्रेट्स असल्याने त्यातून पुढील मूल्यवर्धनाची संधी आहे. अभ्यासानुसार झेंडूच्या फुलांच्या जैवभारात सुमारे ८३.५ टक्के एकूण तंतू आढळतात. या तंतू आणि कार्बोहायड्रेट्सवर जैवप्रक्रिया करून प्रीबायोटिक घटक तयार करता येतात. प्रीबायोटिक्स हे आतड्यातील उपयुक्त सूक्ष्मजीवांच्या वाढीस पोषक ठरणारे घटक आहेत. पशुधन आणि कुक्कुटपालनातील पोषण व आतड्यांच्या आरोग्यासाठी त्यांचे महत्त्व आहे.

» प्रीबायोटिक्सचीही निर्मिती : एन्झाइम प्रक्रियेमुळे झेंडूच्या फुलांमधील जटिल कार्बोहायड्रेट्स अधिक सहज उपलब्ध होतात. त्यातून फ्रुक्टो-ऑलिगोसॅकराइड्स (FOS) यांसारखे कार्यात्मक प्रीबायोटिक घटक मिळवण्याची दिशा विकसित झाली आहे. अभ्यासात एन्झाइम उपचारानंतर फ्रुक्टो-ऑलिगोसॅकराइड्समध्ये ११ टक्के वाढ आढळली. या प्रक्रियेतून मिळालेल्या पदार्थांमुळे Lactobacillus plantarum या उपयुक्त जिवाणूच्या वाढीलाही चालना मिळाल्याचे आढळले. कुक्कुटपालनातील या प्रीबायोटिक घटकांच्या उपयुक्ततेच्या प्रयोगात्मक चाचण्याही करण्यात आल्या आहेत.

» शेवटी उरलेले फूलही शेतीत! : झेंडूच्या फुलांचा एकही भाग वाया जाऊ नये, हाच या संपूर्ण प्रक्रियेचा गाभा आहे. प्रथम फुलातून ल्युटीनसारखा उच्च-मूल्याचा घटक काढायचा, त्यानंतर उर्वरित जैवभारातून प्रीबायोटिक्स मिळवायचे आणि अखेरीस उरलेला सेंद्रिय पदार्थ जैवखत किंवा कंपोस्ट म्हणून शेतीत परतवायचा. स्वाहा सेंटर ऑफ एक्सलन्सच्या 'बजरंग बाण' उत्पादनाच्या साहाय्याने झेंडूचा जैवभार २१ दिवसांत जलद विघटित करून सेंद्रिय खत तयार करण्याची प्रक्रियाही विकसित करण्यात आली आहे. म्हणजेच झेंडूच्या एका फुलाचा प्रवास पूजा आणि सजावटीपासून सुरू होऊन ल्युटीन, प्रीबायोटिक्स आणि शेवटी जैवखतापर्यंत पोहोचतो.

### मंदिरांपासून ग्रामीण उद्योगांपर्यंत नवी साखळी

या तंत्रज्ञानाची खरी कसोटी प्रयोगशाळेत नाही, तर प्रत्यक्ष जमिनीवर होणार आहे. मंदिर, बाजारपेठा, उत्सव आणि विविध समारंभांतून निर्माण होणारे निर्माल्य इतर कचऱ्यापासून वेगळे संकलित केले, तर ते ग्रामीण प्रक्रिया उद्योगासाठी नियमित कच्चा माल ठरू शकते. महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, मंदिर संस्था आणि ग्रामीण उद्योजक यांच्या माध्यमातून विकेंद्रित प्रक्रिया केंद्रे उभारता येऊ शकतात. बाजारात विक्री न झालेली किंवा दर्जामुळे उरलेली फुलेही या साखळीत आणता येतील. यामुळे निर्माल्याची विल्हेवाट लावण्याचा खर्च कमी होईल आणि त्याच वेळी रोजगार व उत्पन्नाची नवी संधी निर्माण होईल.

### कचऱ्याची समस्या की अर्थव्यवस्थेची संधी?

ग्रीन बायोरिफायनरीचा अर्थ केवळ कचऱ्यापासून एखादे उत्पादन बनवणे एवढाच नाही. सर्वाधिक मौल्यवान घटक आधी मिळवणे, उरलेल्या जैवभाराचे पुन्हा मूल्यवर्धन करणे आणि शेवटी अवशेष शेतीत परतवणे, ही त्याची खरी संकल्पना आहे. आज मंदिराच्या बाहेर निर्माल्याच्या ढिगात पडलेले फूल उद्या ग्रामीण उद्योगासाठी कच्चा माल ठरू शकते. पूजा संपल्यानंतर फुलाचे आयुष्य संपत नाही; तिथूनच त्याच्या मूल्यनिर्मितीची खरी सुरुवात होऊ शकते.

# मराठवाडा पदवीधर मतदारसंघासाठी आ. सतीश चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## महायुतीच्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन; कार्यकर्ते व नागरिकांची मोठी गर्दी



**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तसेच भाजपा-शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. सतीश चव्हाण यांनी सोमवार, दि. ५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील गोदावरी पब्लिक स्कूल, टी. व्ही. सेंटरजवळ, एन-१२, हडको येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

या वेळी महायुतीतील प्रमुख नेते, मंत्री, खासदार, आमदार तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री अतुलजी सावे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे, आ. बालाजी पाटील कल्याणकर, आ. विक्रम काळे (मराठवाडा शिक्षक मतदारसंघ) यांच्यासह महायुतीच्या अनेक नेत्यांनी उपस्थित राहून आ. सतीश चव्हाण यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. नांदेड जिल्ह्यातूनही राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, कैलास भाऊ देशमुख, सुधाकर देशमुख, युवक जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महायुतीचे माजी मंत्री, खासदार, आमदार, सर्व जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष, तालुकाध्यक्ष, महापौर, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. 'महायुतीचा अधिकृत उमेदवार विजयी करण्याचा निर्धार' व्यक्त करत कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पदवीधर मतदारांच्या विविध प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि मराठवाड्याच्या विकासासाठी आ. सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमाला महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शक्तिप्रदर्शन केले. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केल्याचे चित्र दिसून आले.

# पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूरमध्ये घेतला 'जनसंवाद'



**लातूर (प्रतिनिधी)** – दिनांक ५ ऑक्टोबर रोजी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला.

आपल्या जिल्हा भेटी दरम्यान, नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीद्वारे पोलीस - नागरिक यांच्यातील 'संवाद' मजबूत करून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस - जनता संबंध अधिक दृढ करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

आज रोजी लातूर जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक हे सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. या दरम्यान, दुपारी ०३.०० ते ०६.३० या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण (५५) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, सायबर फसवणूक, पोलीस संरक्षण, कौटूंबिक वाद, जिवे मारण्याची धमकी इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

# फटाक्यांच्या गोदामाला भीषण आग:२ जण ठार, ७ जखमी

**हिंगोली (प्रतिनिधी)** – हिंगोली शहरातील कपडागल्ली परिसरात फटाक्यांच्या गोदामाला सोमवारी (५ ऑक्टोबर) रात्री पावणेआठच्या सुमारास भीषण आग लागली. गोदामात मोठ्या प्रमाणावर फटाक्यांचा साठा असल्याने आगीसोबत जोरदार स्फोट होऊ लागले. या दुर्घटनेत २ जणांचा मृत्यू झाला असून ७ जण भाजल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमींना तातडीने उपचारासाठी हिंगोलीतील लक्ष्मी लाईफकेअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, आग विझविताना फटाक्यांच्या स्फोटामुळे अग्निशमन दलाचे वाहनही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगोली शहरातील कपडागल्ली भागात गोपाल बासटवार यांचे घर आणि गोदाम आहे. बासटवार हे फटाक्यांचे ठोक विक्रेते असल्याने त्यांच्या गोदामात मोठ्या प्रमाणावर फटाक्यांचा साठा करण्यात आला होता. सोमवारी रात्री साडेसात ते पावणेआठच्या दरम्यान गोदामातून अचानक धूर निघू लागला. काही वेळातच गोदामाला आग लागल्याचे परिसरातील नागरिकांच्या लक्षात आले.

# एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात राज ठाकरेंची एन्ट्री:'तुमच्या रागात सहभागी होण्यासाठी आलोय', ७० हजार पदभरतीवरून सरकारला इशारा



**पुणे (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसह सरकारी पदभरतीच्या विविध मागण्यांसाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात मनसे अध्यक्ष राज ठाकरे सहभागी झाले. आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज ठाकरे यांनी सरकारच्या भरती प्रक्रियेवर, बेरोजगारीवर आणि खासगीकरणाच्या धोरणावर जोरदार टीका केली. मी भाषण करायला नाही, तुमच्या रागात सामील व्हायला आलोय, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.

राज ठाकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या मनातील राग हा केवळ काही दिवसांपुरता किंवा आंदोलनापुरता मर्यादित राहू नये. सरकारवर दबाव निर्माण करण्यासाठी हा असंतोष सातत्याने व्यक्त झाला पाहिजे. सरकारी नोकरीच्या तयारीसाठी तरुणांची अनेक वर्षे खर्ची पडतात. मात्र, परीक्षा, निकाल, भरती प्रक्रिया आणि त्यानंतरच्या विविध अडचणींमुळे त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ निघून जात असल्याचे त्यांनी म्हटले.

राज ठाकरे यांनी मुंबईतील आंदोलनाचा संदर्भ देत सध्याच्या व्यवस्थेवर भाष्य केले. तुमच्याकडे पेपर फुटतात, आमच्याकडे मत फुटतात, असे म्हणत त्यांनी निवडणूक प्रक्रियेपासून सरकारी भरतीपर्यंतच्या व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील वर्षे जशी निघून जातात, तशीच राजकीय प्रक्रियेतही सामान्य नागरिकांची वर्षे जात असल्याचे ते म्हणाले.

एकाच बाजूने मन की बात सुरू आहे; दुसऱ्या बाजूला जणू काही मनच नाही, असा टोला त्यांनी लगावला. सरकारने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# जळगाव जिल्हा परिषदेत 'बोगस' दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा!

## ९२ कर्मचाऱ्यांची नोकरी धोक्यात, प्रशासकीय वर्तुळात खळबळ

**जळगाव (प्रतिनिधी)** – जळगाव जिल्हा परिषदेतून एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी बातमी समोर येत आहे. बनावट तसेच बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरी लाटणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आता जिल्हा परिषद प्रशासनाने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. या घोटाळ्यामुळे तब्बल ९२ कर्मचाऱ्यांची नोकरी आता धोक्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण जळगाव जिल्ह्यात आणि प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

जळगाव जिल्हा परिषदेत एकूण ७१३ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. शासकीय नियमानुसार जिल्हा परिषदेत नोकरी मिळवण्यासाठी उमेदवाराकडे किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. मात्र, शासनाच्या नव्या आदेशानुसार जेव्हा सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांची पुन्हा एकदा सखोल पडताळणी सुरू झाली, तेव्हा अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

विशेष म्हणजे, जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील आणि सर्वच स्तरांवरील पदांवर कार्यरत असलेल्या ७२ कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व नव्याने केलेल्या पडताळणीत थेट १० टक्क्यांपेक्षाही कमी भरले आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी केवळ नोकरी मिळवण्यासाठी बनावट अथवा फुगवलेली प्रमाणपत्रे सादर केल्याचा संशय बळावला आहे.

चौकशी अहवालात हे कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांना तात्काळ नोकरीतून निलंबित करून थेट घरचा रस्ता दाखवला जाईल, असा सडेतोड इशारा जिल्हा परिषद प्रशासनाने दिला आहे.

# मोदी मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाचे वारे, दोन बड्या मंत्र्यांची गच्छंती निश्चित, श्रीकांत शिंदेंना लॉटरी लागणार?

**मुंबई (प्रतिनिधी)** – केंद्र सरकारमधील मोदी मंत्रिमंडळात लवकरच मोठ्या फेरबदलाचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. भारतीय जनता पक्षाने उत्तर प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीसाठी आपल्या ८ उमेदवारांची घोषणा केली आहे. मात्र, या यादीतून केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी आणि केंद्रीय राज्यमंत्री बी. एल. वर्मा या दोन वजनदार मंत्र्यांची नावे गायब असल्याने राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या दोन्ही बड्या नेत्यांचा राज्यसभा कार्यकाळ २५ नोव्हेंबर २०२६ रोजी संपत आहे. पुनर्नियोजन न झाल्याने या दोन मंत्र्यांची गच्छंती जवळपास निश्चित मानली जात असून रिक्त होणाऱ्या जागांवर कोणाची वर्णी लागणार? खासदार श्रीकांत शिंदे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात लॉटरी लागणार का? याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

शासकीय नियमांनुसार, कोणत्याही मंत्र्याला पदावर राहण्यासाठी संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य असणे अनिवार्य असते. हरदीपसिंग पुरी यांना सर्वप्रथम जानेवारी २०१८ मध्ये उत्तर प्रदेशातून राज्यसभेत पाठवण्यात आले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०२० मध्ये ते पुन्हा बिनविरोध निवडून आले आणि २०२४ मध्ये त्यांच्याकडे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, आता भाजपच्या नव्या यादीत नाव नसल्याने पुढील ६ महिन्यांच्या आत त्यांना पुन्हा राज्यसभेवर आणावे लागेल किंवा आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागेल.

### भाजपमध्ये मोठा धक्का तंत्र! केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरींसह ८ विद्यमान राज्यसभा खासदारांना नारळ

उत्तर प्रदेशातील आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने सोमवारी आपल्या आठ उमेदवारांची घोषणा केली. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी आणि बी. एल. वर्मा यांच्यासह भाजपच्या विद्यमान खासदारांना पुन्हा संधी मिळालेली नाही. उत्तर प्रदेशातील राज्यसभा निवडणूक १६ ऑक्टोबर रोजी होणार आहे. भाजपने जाहीर केलेल्या यादीत माजी लोकसभा खासदार प्रियंका सिंह रावत आणि झारखंडचे राज्यपाल तसेच उत्तर प्रदेशातील भाजपचे प्रमुख नेते संतोष गंगवार यांची कन्या श्रुती गंगवार यांचा समावेश आहे. या दोघी पक्षाच्या दोन महिला उमेदवार आहेत.

# इंडिगोच्या तिकीट दरात वाढ



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोच्या विमानांची तिकिटे मंगळवारपासून महागणार आहेत. विमान कंपनीने देशांतर्गत उड्डाणांवर रू. १३०० पर्यंत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर रू. १०,००० पर्यंत अतिरिक्त इंधन शुल्क आकारण्याची घोषणा केली आहे। नवीन दर ६ ऑक्टोबरच्या रात्री १२:०१ वाजल्यापासून लागू होतील.

इंडिगोने यावर्षी तिसऱ्यांदा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवरील इंधन अधिभार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे। यापूर्वी विमान कंपनीने १४ मार्च आणि त्यानंतर १ एप्रिल रोजी भाडेवाढ केली होती.

विमान कंपनीच्या म्हणण्यानुसार, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल म्हणजेच जेट इंधनाच्या किमती वाढल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशन नुसार, गेल्या १० वर्षांत इंधनाच्या किमती सर्वोच्च पातळीवर पोहोचल्या आहेत.


## Change In Name

My Old Name: **SHANTABAI** which now I am changing as New Name: **SHANTABAI BABURAO RATHOD** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

Address: TQ. AMBAD DIST, JALNA AT LALWADI, POST PARNER, JALNA State - Maharashtra-431204. Mob: 8329263280

## Change In Name

My old name is **Sayma** which I am changing as a New name **Shaikh Sayma Shaikh Ayyub** Hence forth my all corespondence will be done as per my new name. Please Consider the same

Contact:- Shaikh Sayma Shaikh Ayyub

Address-Sameera Bagh Waghi Road, NANDED. Maharashtra-431602 M No-9423155593

## Change In Name

My Old Name is **RATHOD RANJEET SINGH** which now I am changing as New Name: **RANJEET SINGH BABURAO RATHOD**, Henceforth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

Address: P.No. 14 OLD KAUTHA NEAR SHITLA MATA MANDIR, KAUTHA NANDED. WAGHALA PO. CIDCO, NANDED-431603. State - Maharashtra

Mob: 8329263280

## Change In Name

My Old Name: **SANGEETA KAUR** which now I am changing as New Name: **SANGITA KAUR RANJEET SINGH RATHOD** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

Address: P.No. 14 OLD KAUTHA NEAR SHITLA MATA MANDIR, KAUTHA NANDED. WAGHALA PO. CIDCO, NANDED-431603. State - Maharashtra

Mob: 8329263280

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

## टी.सी. हरवली

माझी पठाण समीर ताहेर या नावाची इयत्ता सातवी पासची टी.सी. मुखेडनांदेड प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**– संपर्क पत्ता –**

**पठाण समीर ताहेर**

**रा. मोमीन गल्ली, मुखेड, जि. नांदेड.**

## गुणपत्रक हरवले

माझे शशांक शंकर शंखपाळे या नावाचे बांधकाम पर्यवेक्षक चे गुणपत्रक बिलोली ते कासराळी प्रवास करताना हरवले आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

**– संपर्क पत्ता –**

**शशांक शंकर शंखपाळे**

**रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड**

**मो.नं. ९९२३७४५७५३**


## तहकूब वनोपजाचा ई-लिलावाची सुचना

वनोपज मालाच्या इच्छुक खरेदीदारांना कळविण्यात येते की, किनवट वन प्रकल्प विभागाअंतर्गत कार्यरत असलेले राजगड व जलधारा विकी आगारातील तहकुब साग इमारत, साग फाटे, आडजात इमारत व आडजात फाटे, साग बीट, आडजात बीट ईत्यादी वनोपजाचा ई लिलाव दि.०७.१०.२०२६ ते ०९.१०.२०२६ रोजी होणार आहे. यासंबंधात अधिक माहितीसाठी https://eauction.mahaforest.gov.in तसेच एफडीसीएम लिमी. चे www.fdcm.co.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**(बी.के. कलेटवाड)**

**सहाय्यक वेतन व लेखा अधिकारी**

**वन प्रकल्प विभाग किनवट**

## चौकशीची जाहीर नोटीस

(सन १९५० चे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ५० (अ)(१))

अर्ज क्रमांक :- २९८/२०२६ (क-५०अ)

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था:-** श्री. सहस्त्रकुंड वाणगंगा महादेव मंदिर, तीर्थक्षेत्र सहस्त्रकुंड, वाळकी बु. ता. किनवट जि. नांदेड नों.क्र. (ए-२४२७)

**अर्जदार :-** १) नारायण सखाराम दंतलवार रा.इस्लापुर ता.किनवट जि.नांदेड व इतर

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी वर नमुद न्यासासाठी योजना मंजूर करुन मिळणेसाठी म.सा.वि.व्य. अधिनियम १९५० चे कलम ५०(अ)(१) अन्वये अर्ज केला आहे . आणि वरील सार्वजनिक न्यासा संबंधात कलम ५०(अ)(१) अन्वये योजना करणेसाठी मा. धर्मादाय उप आयुक्त,नांदेड विभाग, नांदेड हे चौकशी करणार आहेत.

त्याअर्थी, संबंधीत लोकाच्या माहितीसाठी सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. याकामी कोणाला काही सांगावयाचे असेल किंवा काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची **लेखी कैफियत सर्व पुरावे/कागदपत्रांसह ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून ३० (तीस) दिवसांचे आत स्वतः / वकिलामार्फत व्यक्तिशः अथवा टपालाने या कार्यालयामध्ये सादर करावे.** त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही.

वरील मुदतीत कोणाची काही हकरत आली नाही तर ते कामपुढे चालवून निकाली काढण्यात येईल, सदरची नोटीस माझ्या सहीने व मा.धर्मादाय उप आयुक्त, नांदेड विभाग,नांदेड यांचे शिक्क्यानिशी आज दि. १०/०९/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक न्यायशाखा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

## जाहीरप्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या. क. स्तर भोकर यांच्या न्यायालयात

समक्ष श्री. आर.एस. इरले साहेब सह. दि. न्यायालय क. स्तर, भोकर.

किरकोळ अर्ज क्र. २४३/२०२६

1) समिधा भ्र. सुनिल मोरे
धम्मशिला पि. लक्ष्मणराव कोठेकर (माहेरचे नाव)
वय- ४२ धंदा- नौकरी

2) शालीनीबाई भ्र. नारायण मोरे
कमलाबाई पि. तुळशीराम हनवते (माहेरचे नाव)
वय- ६३ धंदा- सेवानिवृत्त कर्मचारी

3) नारायण पि. भुजंगा मोरे
वय- ६४ धंदा- शेती

सर्व रा. बेंबर ता. भोकर जि. नांदेड

विरूध्द

निरंक

**दावा:-** बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम १ ते ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत सुनिल नारायण मोरे यांचे वारस आहेत. मयत सुनिल नारायण मोरे यांचा मृत्यू दिनांक १७/०७/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतःता न्यायालयात दिनांक ०२/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — स.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर. — दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकर.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# अवैध पाणी उपशावर पथकांची करडी नजर; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची माहिती

## विष्णुपुरी प्रकल्पाचे पाणी राखीव तर ईसापूरच्या पाणी संदर्भात जलसंपदामंत्री घेणार निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**–जिल्ह्यातील विष्णुपुरी, मनार आणि ईसापूर या प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती सध्या समाधानकारक असली तरी आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता विष्णुपुरी धरणातील जलसाठा १०० टक्के पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. यापूर्वीच दक्षता पथक सुरू केले असून, विष्णुपुरी आणि लिंबोटी धरणातून पाणी उपसा शेतकऱ्यांनी करू नये, असे आवाहनही कर्डिले यांनी केले.

ईसापूर धरणातून आवर्तन देण्याबाबतचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



जिल्ह्यातील धरणांमध्ये सध्या पाण्याची पातळी समाधानकारक असली तरी भविष्यातील टंचाईचा विचार करून प्रशासनाने पाण्याचे काटेकोर नियोजन सुरू केले आहे. विष्णुपुरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या अवैध पाणी उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून पाण्याच्या वापरावर नांदेडप्रमाणेच निर्बंधात्मक आदेश काढण्याची विनंती केल्याचे कर्डिले यांनी सांगितले.

ईसापूर धरणातून काही प्रमाणात आवर्तन देणे शक्य आहे. मात्र, आगामी काळातील पावसाची स्थिती आणि उपलब्ध जलसाठा लक्षात घेऊन प्रशासनाने सध्या 'थांबा आणि पाहा' अशी भूमिका घेतली आहे.

अल निनोचा प्रभाव किती आणि कसा असेल, हे सध्या निश्चित सांगता येत नसल्याने संभाव्य पाणीटंचाईचा विचार करून नियोजन केले जात आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध राहावे यासाठी जलसाठ्याचा वापर अत्यंत जपून करण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्पष्ट केले.

## एमजीएमच्या ७१ विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंट

**नांदेड (प्रतिनिधी)** - एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतेच ईगल हायटेक इंडस्ट्रियल कार्पोरेशन प्रा. लि.या कंपनीतर्फे विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले.

सदर कॅम्पस ड्राइव्हमध्ये एकूण ७१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, यामध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे २३ ईलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीचे २६ आणि बिसिएस चे २२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सदर ड्राइव्ह साठी ईगल इंडस्ट्रियल कार्पोरेशनचे एच. आर. आणि डायरेक्टर सुरेश आवटे प्रमुख प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत त्यांच्या तांत्रिक क्षमता, संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि उद्योगक्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांचे मूल्यांकन केले आणि निवड केली.

या कॅम्पस ड्राइव्हच्या आयोजनामध्ये प्रा. हिमांशू जोशी, प्रा. चंद्रशेखर बांदेला, प्रा. देवीप्रसाद तुप्तेवार डॉ.सुनील डहाळे प्रा गिरीश देशपांडे,सुधाकर जाधव आणि त्यांच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष कमलकिशोर कदम, डायरेक्टर डॉ.गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ.शिरिष कोटगीरे, टिपीओ प्रा.शिवप्रसाद तितरे विविध विभागप्रमुख आदींनी अभिनंदन केले.

# वजिराबाद चौकातील सिग्नल 'असून अडचण, नसून खोळंबा'; वाहतूक कोंडीने नांदेडकर त्रस्त

## सौरऊर्जेवरील सिग्नलचा बोजवारा, वेळेत तफावत अन् अतिक्रमणाचा विळखा

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– महानगरपालिकेने शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी चार ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे वाहतूक सिग्नल बसवण्याचा निर्णय घेतला होता. त्यापैकी वजिराबाद चौकातील सिग्नल कार्यान्वित करण्यात आले, मात्र हा सिग्नल केवळ नावापुरताच असून, पूर्ण क्षमतेने वाहतूक नियंत्रण करत नसल्याचे दिसून येत आहे.

सिग्नलच्या वेळेत मोठी तफावत असल्याने चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. महापालिकेने आयटीआय, आनंदनगर आणि तरोडा नाका येथेही सिग्नल बसवण्याचा निर्णय घेतला होता, परंतु तो निर्णय कागदावरच राहिला आहे.

शहरात जागोजागी वाहतूक कोंडी होत असताना वाहतूक शाखेकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याचे चित्र आहे. वजिराबाद आणि इतवारा अशा वाहतूक शाखेच्या दोन विंग असूनही शहरात कुठे ना कुठे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

### ई-चलनची मागणी

पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी पुढाकार घेऊन सिग्नल योग्यरित्या सुरू करावेत, अशी मागणी होत आहे. वजिराबाद चौकातील सिग्नल तोडणाऱ्या वाहनधारकांवर ई-चलनद्वारे थेट मोबाईलवर दंडाचा संदेश जाईल, अशी यंत्रणा कार्यान्वित केल्याशिवाय सिग्नल तोडण्याची हिंमत कमी होणार नाही.

### अतिक्रमणाचा विळखा

दुसरीकडे शहरातील रस्त्यांवर पुन्हा अतिक्रमणाने डोके वर काढले आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, मुथा चौक ते महावीर चौक, शिवाजीनगर फूल मार्केट, श्रीनगर, तरोडा नाका, आनंदनगर या मार्गावर फुटपाथवर फळगाडे, हातगाडे आणि व्यापाऱ्यांनी कब्जा केला आहे. तर देगलूर नाका, मनियार गल्ली, जुना मोंढा, बरकी चौक, तरोडा मार्केट परिसरातही अतिक्रमणामुळे वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.



महावीर चौक ते जुना मोंढा आणि वजिराबाद ते महावीर चौक दरम्यान एकेरी वाहतूक लागू असतानाही दुहेरी वाहतूक सुरू असून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तसेच विनापरवाना ऑटो, काळी फिल्म लावलेली चारचाकी वाहने आणि फॅन्सी नंबर प्लेटच्या वाहनांवर वाहतूक शाखा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. शहरातून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असून त्याचा फटका शाळकरी विद्यार्थ्यांना बसत आहे. वजिराबाद चौकातील सिग्नलकडे संबंधित कंत्राटदार आणि मनपा प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.



**नांदेड** – नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी प्रकाश गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी त्यांना नियुक्तीपत्र देताना ग्रामीण जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, डॉ. मुजाहिद खान, सौ. कल्पना पाटील डोंगळीकर, तातेराव पाटील, बाळासाहेब मादसवाड, लक्ष्मण भवरे, रविंद्र बडगुजर, दिगंबर गवळे आदी. **(छाया : सचिन डोंगळीकर नांदेड)**

# दुष्काळ यादीचा जीआर काढा, पीकविम्याची अट रद्द करा; मुखेडमध्ये साखळी उपोषण

## दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुका दुष्काळ यादीत (Trigger-1) समाविष्ट केल्याचा जीआर रद्द करा, पीकविमा मंजुरीसाठी सॅटेलाईटद्वारे ५० टक्के भारांकनाची खरीप २०२६ पासून लावलेली अट रद्द करा, यासह विद्यार्थी, मजूर, महिलांच्या इतर १० मागण्या मान्य कराव्यात, या मागणीसाठी आजपासून तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांच्या नेतृत्वाखाली वर्ताळा गणातील शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

१ ऑक्टोबर रोजी तीव्र रास्ता रोको आंदोलन करून मुखेड तालुका Trigger-१ मधून वगळून जीआर काढण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप शासनाकडून जीआर निघाला नसल्याने आजपासून तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

मुखेड तालुक्यातील दररोज एका गणातील शेतकऱ्यांच्या सहभागाने कार्यालयीन वेळेत मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे.

## डॉ. विलास भद्रे यांचे निधन

**उमरी (प्रतिनिधी)** – आंबेडकर चळवळीचे विचारवंत साहित्यिक, कवी, गायक, डॉ. विलास अमृतराव भद्रे यांचे दि. ५ आक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते



त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगी, १ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. उमरी वैकुंठधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अरुण भद्रे, यांचे भाऊ होत.

# एशिया पॅरा गेम्स् स्पर्धेसाठी भाग्यश्री जाधवची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)**– दिंडची भूमिकन्या तथा पुणे येथे मुख्य क्रीडा अधिकारी (वर्ग-१) म्हणून कार्यरत असणाऱ्या भाग्यश्री जाधव यांची जपान येथे होणाऱ्या एशियन पॅरा गेम्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवासी असलेल्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत स्वतःचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. सन २०१७ पासून त्यांची क्रीडा कारकीर्द सुरू झाली. अवघ्या ९ वर्षांच्या कालावधीत त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये २५ सुवर्ण, ४ रौप्य आणि ७ कांस्य अशा एकूण ३६ पदकांची कमाई केली आहे. आजवर त्यांनी तब्बल १० देशांमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय व जागतिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.



सन २०२१ मध्ये टोकियो आणि २०२४ मध्ये पॅरिस येथे पार पडलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. विशेष म्हणजे, पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचे ध्वजवाहक होण्याचा ऐतिहासिक मानही भाग्यश्री जाधव यांना मिळाला होता. क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्य सरकारने त्यांना 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार'ने सन्मानित केले असून, त्यांची मुख्य क्रीडा अधिकारी (वर्ग-१) या पदावर नियुक्ती केली आहे.

जपानमधील आयची-नागोया येथे १८ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणाऱ्या 'एशियन पॅरा गेम्स' स्पर्धेसाठी 'पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडिया'कडून भाग्यश्री जाधव यांची निवड करण्यात आली आहे. दर चार वर्षांनी होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत त्यांना दुसऱ्यांदा सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

## शिवाजी पाकलवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सेवानिवृत्त मेजर, सी.आर.पी.एफ.चे जवान तथा उमरी तालुक्यातील शिवनगाव येथील रहिवासी शिवाजी पाकलवाड (वय ६३ वर्षे) यांचे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी जळगाव येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता हिंदू स्मशानभूमी बारड रोड, मुदखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात भाऊ, बहिणी, पत्नी, मुलगी, जावई, दोन मुले, पुतणे, सुना असा परिवार आहे. स्व. शिवाजी पाकलवाड हे मनमिळावू, शांत स्वभाव आणि मित्तभाषी होते. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# किनवटच्या लक्ष्मी कुरेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**किनवट (प्रतिनिधी)**– किनवट तालुक्यातील प्रधानसांगवी (दुधगाव) येथील कु. लक्ष्मी मच्छिंद्र कुरे हिने आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर कुस्तीच्या मैदानात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, गोकुंदा येथे इयत्ता १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या लक्ष्मीने अंडर- १९ गटातील ६२ ते ६५ किलो वजनगटात लातूर येथे झालेल्या विभागीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.या उल्लेखनीय कामगिरीमुळे लक्ष्मीची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही स्पर्धा रायगड येथे होणार आहे. ग्रामीण भागातून आलेल्या लक्ष्मीने मिळविलेले हे यश किनवट तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.



लक्ष्मीच्या यशामागे तिचे आई-वडील आणि कुटुंबियांचे मोठे योगदान आहे. तिचे वडील मच्छिंद्र कुरे हे सेवक म्हणून काम करतात, तर आई घरकामासोबत शेतीची जबाबदारी सांभाळते. कुटुंबाच्या मर्यादित परिस्थितीतही लक्ष्मीने अभ्यासासोबत कुस्तीचा सराव सुरू ठेवत खडतर परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळविले.

# ग्राहक न्यायासाठी प्रकरणांचे परजिल्ह्यात हस्तांतरण टाळावे; ग्राहकांवरील आर्थिक व मानसिक भार वाढण्याची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, नांदेड येथील प्रलंबित ग्राहक तक्रारी इतर जिल्ह्यांतील आयोगांकडे हस्तांतरित करण्याच्या हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर नांदेड अधिवक्ता संघाने याला आक्षेप नोंदविला आहे. ग्राहकांना त्यांच्या जिल्ह्यातच सुलभ, कमी खर्चात आणि वेळेत न्याय मिळणे हा ग्राहक संरक्षण व्यवस्थेचा मूलभूत उद्देश असल्याने केवळ प्रशासकीय कारणास्तव प्रकरणांचे सरसकट हस्तांतरण करू नये, अशी भूमिका संघाने घेतली आहे.

अधिवक्ता संघाचे सचिव अॅड. कपिल गाडेगावकर यांनी सांगितले की, ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत ग्राहकांना संबंधित अधिकारक्षेत्रात तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रकरण हस्तांतरित करण्याचा निर्णय घेताना केवळ प्रलंबित प्रकरणांची संख्या हा निकष न ठेवता संबंधित ग्राहकाचे हित, प्रकरणाची अवस्था, ग्राहकाचे वय, आर्थिक परिस्थिती, प्रवासाचे अंतर आणि होणारा अतिरिक्त खर्च यांचा सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे.

नांदेडमधील प्रकरणे दूरच्या जिल्ह्यात वर्ग झाल्यास ग्राहकांना सुनावणीसाठी वारंवार प्रवास करावा लागू शकतो. परिणामी प्रवासाचा खर्च, वेळेचा अपव्यय आणि वकिलांच्या अतिरिक्त शुल्काचा आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांसाठी हा प्रश्न अधिक गंभीर ठरू शकतो.

प्रकरण हस्तांतरित करण्यापूर्वी संबंधित ग्राहक आणि त्यांच्या प्रतिनिधींना पूर्वसूचना देऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी, अशीही मागणी अधिवक्ता संघाने केली आहे.

# जिल्ह्यात चोऱ्यांच्या घटना; सोन्या-चांदीचे दागिने, सोयाबीन आणि दुचाकी लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**–जिल्ह्यात वेग-वेगळ्या ठिकाणी चोरीच्या तीन घटना उघडकीस आल्या असून, पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### प्रवासी महिलेचे दागिने लंपास - नांदेड ग्रामीण

दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २.४५ वाजताच्या सुमारास नांदेड-हुमनाबाद मार्गावरील कर्नाटक परिवहनची बस क्र. (K-38 F-1268) मध्ये प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशाच्या पर्समधील सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेले. लातूर फाटा, नांदेड येथे ही घटना घडली.

अनोळखी चार महिला चोरट्यांनी संगनमत करून एकूण २ लाख ३८ हजार १५० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी तस्लीमबानू मोहम्मद गौस (वय ५०, रा. हिलाल नगर, देगलूर नाका, नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२८८/२०२६ कलम ३०३(२), ३(५) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सपोनि नाईक करत आहेत.

### शेतातील सोयाबीन चोरी -माहूर

दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान मौजे हडसणी शेतशिवार, ता. माहूर येथे शेतात कापणी करून ठेवलेले सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोयाबीन चोरीला गेले.

याप्रकरणी प्रतिभा आशीर्वाद जाधव, आशीर्वाद गणपत जाधव, पंजाबराव हनुमंतराव संगावकर, बेबी पंजाबराव संगावकर, शुभम दादाराव शिंदे, दादाराव साहेबराव शिंदे, अवधूत दिगंबर जाधव, अमोल पंजाबराव संगावकर (सर्व रा. हडसणी, ता. माहूर) या आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पुष्पा सीताराम कदम (वय ६५, रा. हडसणी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माहूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २१०/२०२६ कलम ३०३(२), ३५२, ३५१(१)(२), ३(५) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोना गेडाम करत आहेत.

### दुचाकी चोरी - अर्धापूर

दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास मौजे पिंपळगाव (म) येथे दुकानासमोर लावलेली बजाज पल्सर २२० मोटारसायकल क्र. MH-26 CX-1908 (किंमत १ लाख रुपये) दोन अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली.

याप्रकरणी फिर्यादी मनोज मधुकर कल्याणकर (वय २६, रा. पिंपळगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५४८/२०२६ कलम ३०३(२), ३(५) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल असून, तपास पोहेकॉ पाटील करत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com